


दैनिक

# सिंहवाणी वृत्त

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे


“ स्वच्छ विचार,
उच्च आचरण आणि
सर्वांच्या कल्याणासाठी
समर्पित जीवन हाच
खरा गांधीवाद आहे.”

- महात्मा गांधी




Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९३ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६


# समुद्रात बुडून ८ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू

## रायगडमध्ये सहलीचा आनंद ठरला जीवघेणा

**वृत्तसंस्था, रायगड**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या दिवेआगर समुद्रकिनारी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. पुण्यातील आळंदी परिसरातून सहलीसाठी आलेल्या आठ विद्यार्थ्यांचा समुद्राच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आनंदाच्या वातावरणात निघालेली ही शैक्षणिक व पर्यटनाची सहल क्षणार्धात शोकाकुळ वातावरणात बदलली असून या दुर्घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पुण्याहून विद्यार्थ्यांचा एक मोठा गट रायगडच्या निसर्गरम्य किनारपट्टीचा आनंद घेण्यासाठी दिवेआगर येथे आला होता. सर्व विद्यार्थी समुद्रकिनारी फिरत असताना काही जण उत्साहाच्या भरात पोहण्यासाठी पाण्यात उतरले. मात्र, भरतीच्या वेळेची आणि पाण्याच्या



खोलीची पुरेशी कल्पना नसल्यामुळे अचानक आलेल्या मोठ्या लाटांचा अंदाज चुकला. समुद्राच्या वेगवान प्रवाहामुळे आणि पाण्याच्या ओढ्यामुळे आठ विद्यार्थी खोल पाण्यात खेचले गेले आणि बुडू लागले. विद्यार्थी पाण्यात बुडत असल्याचे लक्षात येताच किनाऱ्यावरील इतर सोबत्यांनी व स्थानिकांनी मोठा आक्रोश केला.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक मच्छिमार, जीवरक्षक आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर सर्व विद्यार्थ्यांना पाण्यातून बाहेर काढून तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती आठही विद्यार्थ्यांना मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेची बातमी समजताच विद्यार्थ्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलीस प्रशासनाने घटनेचा पंचनामा केला असून सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या दुःखाद प्रसंगी स्थानिक प्रशासन पीडित कुटुंबांच्या संपर्कात असून पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि मृतदेह नातेवाकिांच्या स्वाधीन करण्याचे काम वेगाने सुरू आहे. पर्यटकांनी व समुद्रकिनारी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्याच्या खोलीचा अंदाज घेऊन सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून पुन्हा एकदा करण्यात आले आहे.

### थोडक्यात

## जरांगे पाटलांना मोठा धक्का

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. कारण त्यांच्या समर्थकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १० ते ११ जणांवर धमकी तसेच महिलेवर अश्लील आरोप करुन ते सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंतरवलीतील मराठा आंदोलक ललिता तारख यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर ललिता तारख यांच्यावर अत्यंत गलिच्छ भाषेत टीका केली जात असून, अकतंत्रज्ञानाचा गैरवापर करून त्यांचा चेहरा अश्लील चित्रांवर लावून बदनामीकारक व्हिडिओ व फोटो पसरवले जात आहेत. गेल्या काही दिवसापासून अंतरवाली सराटी मधील मराठा आंदोलक ललिता तारख यांनी मनोज जरांगे यांच्या भूमिकेवरती प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर यांच्यावर सोशल मीडिया वरती अश्लील टीका टिपणी होत होती, त्यामुळे त्यांनी या अश्लील टीका टिप्पणीच्या विरोधात पोलिसात धाव घेतली त्या नंतर आज अंबड पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ललिता तारख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सोशल मीडियावर अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अकनिर्मित अश्लील फोटो आणि व्हिडिओ बनवून बदनामी केल्याचा आणि धमक्या दिल्याचाही तक्रारीत उल्लेख केला आहे. धमक्या देणाऱ्यांवर आणि बदनामी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची आणि २०२३ पासून माझ्यासह सर्वांच्या संपत्तीची चौकशी करण्याची ललिता तारख यांनी मागणी केली आहे.

# गोरेगाव मार्गावर भीषण अपघात; तिघांचा मृत्यू, एक गंभीर

## हिरडामाली – मिलटोली परिसरातील मध्यरात्रीची दुर्घटना; वाहनांचे अक्षरशः परखच्चे उडाले

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोरेगाव मार्गावरील हिरडामली-मिलटोली परिसरात बुधवार आणि गुरुवारच्या मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ता अपघातात तिघांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला. या दुर्घटनेत वाहनांचे अक्षरशः परखच्चे उडाल्याने अपघाताची तीव्रता स्पष्ट झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास हिरडामली-मिलटोली परिसरात संबंधित वाहनांचा अपघात झाला. धडक इतकी जोरदार होती की वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. नंतर पोलिसांनाही





घटनेची माहिती देण्यात आली. या भीषण दुर्घटनेत गोरेगाव येथील पियुष बारोवार (२७) तसेच सोनी येथील मनोज मधुकर कुरंजेकर (२५) आणि विनय धन्या कोहरे (२४) यांचा मृत्यू झाला. तर गोरेगाव येथील शिव मानकर (२१) गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर गोंदिया येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला बाहेर काढण्यासाठी मदत केली. त्यानंतर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू केली.

दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. वाहनांचा वेग, चालकाचे नियंत्रण सुटणे किंवा अन्य कोणते कारण दुर्घटनेमागे होते का, याचा तपास केला जात आहे. अपघातातील मृतांची ओळख पटविण्यासह त्यांच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली आहे.

या दुर्घटनेमुळे गोरेगाव आणि सोनी परिसरात शोककळा पसरली असून, तरुणांचा अपघाती मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, गंभीर जखमी शिव मानकर याची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे.

# कर्जमाफीचा तिसरा हप्ता खात्यात जमा

**वृत्तसंस्था, मुंबई**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमाफी योजनेचा तिसरा हप्ता शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. एकूण ३,१६१ कोटी रुपये राज्यातील ३.२७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट वितरित करण्यात आले आहेत.

बँकांनी लावलेल्या जास्त व्याजदरामुळे हा हप्ता काही काळ रखडला होता. मात्र, आता हा तिढा सुटला असून, हजारो शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून त्यांना आर्थिक दिलासा देण्याचा हा प्रयत्न राज्य शासनाकडून सातत्याने सुरू आहे. या योजनेमुळे राज्यातील शेतीत सक्षमीकरण होण्यास मदत होईल. कर्जमाफीच्या या टप्प्याने शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडण्याची आशा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमाफी योजनेचा तिसरा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. एकूण ३,१६१ कोटी रुपये राज्यातील ३.२७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट वितरित करण्यात आले आहेत. बँकांनी लावलेल्या जास्त व्याजदरामुळे हा हप्ता काही काळ रखडला होता. मात्र, आता हा तिढा सुटला असून, हजारो शेतक-यांना याचा मोठा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे शेतक-यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून त्यांना आर्थिक दिलासा देण्याचा हा प्रयत्न राज्य शासनाकडून सातत्याने सुरू आहे. या योजनेमुळे राज्यातील शेतीत सक्षमीकरण होण्यास मदत होईल. कर्जमाफीच्या या टप्प्याने शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडण्याची आशा आहे.

### वाढीव व्याजदरामुळे रखडली होती प्रक्रिया

राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर पहिल्या दोन टप्प्यांत तब्बल १० हजार ११५ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात यशस्वीपणे जमा केले होते. मात्र, तिसऱ्या हप्त्याच्या वितरणावेळी एक तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. काही बँकांकडून शेतकऱ्यांच्या थकीत कर्जावर प्रमाणापेक्षा जास्त व्याजदर आकारण्यात आल्याचे सरकारच्या निदर्शनास आले. या तफावतीमुळे तिसऱ्या हप्त्याचे वाटप तात्पुरते थांबवण्यात आले होते.

### सुधारित माहितीनंतर वितरणास गती

या समस्येची दखल घेत सरकारने संबंधित बँकांना आकडेवारी आणि व्याजदराबाबत सुधारित (रिवाईज्ड) माहिती सादर करण्याचे निर्देश दिले होते. सहकार विभागाने दिलेल्या माहितीनुसार आता अनेक बँकांकडून ही सुधारित माहिती प्राप्त झाली असून त्यानुसार पात्र शेतक-यांच्या खात्यात तिस-या हप्त्याची रक्कम जमा करण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत या टप्प्यातील ३ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी याचिकाकर्त्यांना धक्का

**छ. संभाजीनगर :** कुणबी जातप्रमाणपत्र अवैध ठरलेल्या याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात विभागीय आयुक्तांकडे अपील करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली. १० ऑगस्ट २०२६ पूर्वी जात पडताळणी समितीने दिलेले सर्व आदेश अंतिम असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या आदेशांना आव्हान द्यायचे असल्यास थेट उच्च न्यायालयातच दाद मागावी लागणार आहे. दरम्यान, राज्य सरकारने २२ जुलै २०२६ रोजी कायद्यात दुरुस्ती करून विभागीय आयुक्तांकडे अपीलची तरतूद केली होती. मात्र या दुरुस्तीची अंमलबजावणी १० ऑगस्टपासून सुरू झाली. त्यामुळे १० ऑगस्टपूर्वीच्या आदेशांवर नव्या कायद्यानुसार विभागीय आयुक्तांकडे अपील करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. परभणीच्या कोमल गंगाधर पारवे आणि छत्रपती संभाजीनगरच्या ज्योती श्रीधर दहिहंडे यांच्या कुणबी जातप्रमाणपत्रांवर जात पडताळणी समितीने आक्षेप घेतला होता. या निर्णयाला आव्हान देण्यासाठी दोन्ही याचिकाकर्त्यांनी थेट उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# कॉंग्रेसचा पहिला उमेदवार जाहीर

**वृत्तसंस्था, पुणे**

महायुतीचे चर्चेचे गुऱ्हाळ सुरू असतानाच महाविकास आघाडीत कॉंग्रेसने अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी अदिती पोहरेंना उमेदवारी जाहीर केली आहे. शिवाजी शिक्षण संस्थेचे शिवाजीराव देशमुख यांची मुलगी आणि देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांची सून आदिती पोहरेंना उमेदवारी जाहीर झाल्याचे यशोमती ठाकूर यांनी सांगितले. मुंबईतील टिळक भवन येथे अदिती ऋषिकेश पोहरे यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्या उमेदवारीची घोषणा केली. दुसरीकडे विधान परिषद पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी महायुतीचा फॉम्युर्ला ३-१-१ असा ठरल्याची माहिती आहे.

पुणे शिक्षक जागेवर भाजप आणि शिवसेनेत रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे ही जागा कोणाकडे जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संभाजीनगरची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडे, अमरावती शिक्षक मतदारसंघाची जागा शिवसेना शिंदे गटाकडे, नागपूर पदवीधर मतदारसंघाची जागा भाजपकडे



आणि पुणे पदवीधर मतदारसंघाची जागा भाजपाकडे जाण्याची शक्यता आहे. पुणे शिक्षकवरून महायुतीत घोडं अडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# महाराष्ट्रात ५ वर्षातला सर्वात मोठा धमाका! ८.५७ लाख कोटींचे ६७ सामंजस्य करार, २.९१ लाख रोजगारांची निर्मिती

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला अभूतपूर्व गती देणारा 'महाराष्ट्र इन्व्हेस्टमेंट समिट' अत्यंत यशस्वी ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या समिटमध्ये तब्बल ८ लाख ५७ हजार ४५२ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे ६७ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रचंड गुंतवणुकीच्या माध्यमातून राज्यात तब्बल २ लाख ९१ हजार १०९ नवीन रोजगार निर्माण होणार असून, यामुळे राज्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या प्रचंड संधी



उपलब्ध होणार आहेत.

या गुंतवणूक करारांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित क्षेत्रांनी बाजी मारली आहे. डेटा सेंटर्स, माहिती-तंत्रज्ञान आणि सेमिकंडक्टर क्षेत्रामध्ये सर्वाधिक म्हणजे ४ लाख १५ हजार ४९० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित करण्यात आली आहे. याशिवाय एरोस्पेस व संरक्षण क्षेत्रात तसेच ऊर्जा आणि क्लीनटेक क्षेत्रात प्रत्येकी १० महत्त्वाचे करार पार पडले आहेत. समिटमध्ये विविध महत्त्वाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये खालीलप्रमाणे मोठे करार झाले आहेत,

ऊर्जा आणि क्लीनटेक : ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा, बॅटरी एनर्जी आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस क्षेत्रात १ लाख २ हजार ५१९ कोटी रुपये.

मेटल्स आणि मायनिंग : धातू आणि खाणकाम क्षेत्रात ७५ हजार कोटी रुपये.

संरक्षण आणि अंतरिक्ष : २७ हजार ९३० कोटी रुपये.

पायाभूत सुविधा व लॉजिस्टिक्स : इन्फ्रास्ट्रक्चर, लॉजिस्टिक्स आणि बांधकाम साहित्य क्षेत्रात १८ हजार ७५१ कोटी रुपये.

इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र : १२ हजार ६५१ कोटी रुपये.

केमिकल्स, शेती, सेवा व GCC : रसायने, कृषी, सेवा आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स क्षेत्रात ८ हजार ८०१ कोटी रुपये.

स्टील उत्पादन : ७ हजार कोटी रुपये.

आरोग्य क्षेत्र : ६ हजार ५०० कोटी रुपये.

इतर विविध क्षेत्रे : १ लाख ८२ हजार ८१० कोटी रुपयांची गुंतवणूक.

### राज्याच्या औद्योगिक विस्ताराला नवी दिशा

महाराष्ट्र इन्व्हेस्टमेंट समिटच्या माध्यमातून झालेल्या या करारांमुळे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांचे जाळे राज्यभरात विस्तारणार आहे. यामुळे केवळ मुंबई-पुणेच नव्हे, तर राज्यातील इतर भागांमधील औद्योगिक विकासाला आणि स्थानिक रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळणार आहे.

# आज महाराष्ट्रात यूपीआय बंद, व्यापारी फक्त कॅश व्यवहार स्वीकारणार

**मुंबई :** डिजिटल पेमेंटचे मुख्य माध्यम असलेल्या यूपीआय व्यवहारांवरील एमडीआरच्या मुद्द्यावरून राज्यातील व्यापारी वर्ग आक्रमक झाला आहे. एमडीआरच्या नावाखाली व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याचा आरोप करत, याविरोधात सामूहिक भूमिका मांडण्यासाठी २ ऑक्टोबर रोजी राज्यभरात NO UPI - NO PAYMENT मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अँग्रिकल्चरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन बैठकीत राज्यातील विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी हा एकमुखाने निर्णय घेतला आहे.महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या अध्यक्षतेखाली ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यूपीआय हे डिजिटल पेमेंटचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम असून चेंबरचा यूपीआयच्या (वढक) वापराला किंवा डिजिटल व्यवहारांना अजिबात विरोध नाही, असे स्पष्टीकरण या बैठकीत देण्यात आले. मात्र, यूपीआय व्यवहारांवर आकारल्या जाणाऱ्या एमडीआरमुळे लहान-मोठ्या व्यापाऱ्यांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक ताण पडत आहे. हा आर्थिक भार व्यापाऱ्यांवर टाकला जाऊ नये, हीच व्यापारी वर्गाची मुख्य मागणी असल्याचे चेंबरने अधोरेखित केले आहे.

संपादकीय लेखणीतून...

## मुलांनो, ज्येष्ठांचा आदर- सहानुभूती

वृद्ध व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश वृद्ध व्यक्तींच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांचे आरोग्य, सन्मान आणि अधिकार यांना प्रोत्साहन देणे आहे. वृद्ध व्यक्ती हे समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत, ज्यांनी त्यांच्या ज्ञान, अनुभव आणि योगदानाने आपली पिढी घडवली आहे. या दिवसाच्या निमित्ताने वृद्ध व्यक्तींच्या समस्या आणि त्यांच्या गरजांकडे लक्ष वेधले जाते. त्यांना सन्मानाने जगता यावे, त्यांचे आरोग्य चांगले राहावे, आणि त्यांना एकटेपणाचा सामना करावा लागू नये यासाठी समाजाने जबाबदारी घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या गरजा, स्वातंत्र्य आणि सामाजिक सहभाग वाढविण्याबाबत विचारमंथन केले जाते. मानवी जीवनातील वृद्धावस्था ही साधारणपणे ६५ वर्षांनंतर सुरू होणारी एक नैसर्गिक आणि महत्त्वाची अवस्था आहे. वृद्धावस्थेतील शारीरिक व मानसिक बदलः शारीरिक बदलः त्वचेवर सुरकुत्या पडणे, केस पांढरे व विरळ होणे, दृष्टी व श्रवणशक्ती कमी होणे.

आरोग्य समस्याः सांधेदुखी, हाडे कमजोर होणे, स्मरणशक्ती मंदावणे आणि निद्रानाश. ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियांची शिथिलता.

मानसिक स्थितीः एकाकीपण जाणवणे, कुटुंबाकडून प्रेमाची आणि आधाराची अपेक्षा असणे.

वृद्धांची काळजी व सामाजिक जबाबदारीः आदर आणि सहानुभूतीः ज्येष्ठांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे. आरोग्य सांभाळः नियमित वैद्यकीय तपासणी, योग्य आहार आणि औषधोपचारांची वेळ पाळणे. सरकारी योजनाः निराधार व गरजू ज्येष्ठांसाठी शासनाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मार्फत वृद्धाश्रम आणि निवृत्ती वेतन योजना राबवल्या जातात. दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय वृद्धांचा-ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो.

जागतिक वृद्ध दिनाचे महत्त्वः सन्मान करणेः समाजासाठी आणि कुटुंबासाठी आयुष्यभर मेहनत घेणाऱ्या वृद्ध व्यक्तींच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे. जागरूकता वाढवणेः वृद्धांच्या आरोग्य व समस्या, एकाकीपण आणि त्यांच्याशी संबंधित इतर आव्हानांवर चर्चा करणे.

हक्कांचे रक्षणः वृद्धांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणे आणि समाजात त्यांना योग्य तो मान मिळवून देणे.

महत्त्वाचे कायदे व तरतुदीः भारतात आणि महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी व कल्याणासाठी कायदे केले गेले आहेत, जसे की "द मेंटेनन्स अँड वेल्फेअर ऑफ पेरेंट्स अँड सीनियर सिटीजन्स एक्ट २००७" या कायद्यानुसार पालकाची व वृद्धांची काळजी घेणे, ही त्यांची मुले किंवा कायदेशीर वारसदार यांची कायदेशीर जबाबदारी आहे.

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन ज्येष्ठ नागरिकांना समर्पित असून जगभरातील १ ऑक्टोबर रोजी हा दिवस लक्षात येतो. आजचा काळ हा वृद्ध प्रौढांवर प्रभाव पाडणाऱ्या पॉईंट्सच्या बाबतीत चेतना वाढविण्यास समर्पित आहे. आजच्या घडीला आपण ज्येष्ठ नागरिकाने त्याच्या समर्पण, कर्तृत्व आणि त्यांनी आपल्या आयुष्यात जे काही प्रदाते दिले आहेत त्याबद्दल आपण त्यांचे कौतुक केले पाहिजे. वृद्धांना प्रभावित करणाऱ्या समस्यांबद्दल जागरुकता वाढवून हा दिवस साजरा करतात, जसे की वृद्धत्व आणि वृद्धांवरील होणारे अत्याचार. वृद्ध व्यक्तींनी समाजासाठी केलेल्या योगदानाची प्रशंसा करण्याचा हा दिवस आहे.ज्येष्ठ नागरिकांचा जास्तीत जास्त वेळ सामाजिक कार्य आणि विकासासाठी असतो. ते खूप सेवाभावी आहेत आणि इतर व्यक्तीचे जीवन चांगले बनवण्यासाठी त्यांना काम करायला आवडते. त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करणे महत्त्वाचे आहे. हा दिवस संपूर्ण पणे ज्येष्ठांना समर्पित करण्यात आला आहे. वृद्धाश्रमात त्यांच्यासाठी बऱ्याच प्रकाराचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांच्या आनंदाची आणि आदराची काळजी घेतली जाते. विशेषतः त्यांच्या सोयीचा आणि समस्यांचा विचार केला जातो आणि त्यांच्या आरोग्याकडे गंभीरतेने जातीने लक्ष दिले जाते.

ज्येष्ठमंडळी आपल्यासाठी ईश्वराचे अवतार असतात, ज्यांच्या आशीवार्दामुळे आपले पालन होते, आपल्या मनात त्यांच्याप्रति प्रेम आणि आदर असणं स्वाभाविक आहे. परंतु त्यातूनही अधिक महत्वाचे आहे त्या परिस्थितीमध्ये त्यांना साथ देणं. जेव्हा ते असहाय्य आणि अक्षम असतात. तेव्हा त्यांच्याबद्दल आपले खरे प्रेम आणि खरी श्रद्धा टिसून येते. जरी हे समयाभावे नेहमी शक्य नसल्यास, एका दिवशी आपण त्यांबद्दल जेवढे शक्य असल्यास निष्ठावान असायला पाहिजे. कारण त्यांना प्रेमाशिवाय काहीही नको. आपल्या सर्वांचें हे कर्तव्य आहे की आपण अशी वेळच येऊ देऊ नये की हा दिवस त्यांना वृद्धाश्रमात साजरा करावा लागेल. म्हणून प्रत्येक नागरिकांचे हे कर्तव्य आहे की ते आपल्या घरच्या वडिलधाऱ्यांची आणि ज्येष्ठांची काळजी घ्यावी आणि त्याचा सांभाळ चांगल्याप्रकारे करावा.



# अरबी समुद्रात पाकिस्तानचा 'नार्को-दहशतवादाचा' कट उधळला

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

आजचे युद्ध केवळ सीमेवर बंदुकीच्या गोळ्यांनी लढले जात नाही, तर ते देशाच्या युवा पिढीला आतून पोखरण्यासाठी अत्यंत नियोजनबद्धरीत्या लढले जात आहे, हे २५ सप्टेंबर २०२६ च्या ताज्या घटनेने पुन्हा एकदा अत्यंत विदारकपणे समोर आणले आहे. लक्षद्वीपच्या पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या अथांग निळ्या पाण्यावर भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात दहशतवादविरोधी पथकाने संयुक्तपणे जी ऐतिहासिक कारवाई केली, ती केवळ एका बोटीची साधी पकडपकडी नाही, तर तो भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर होणाऱ्या एका छुप्या आणि सुनियोजित हल्ल्याचा मोठा पदार्फाश आहे. २५ सप्टेंबरला एका संशयास्पद इराणी बोटीचा जाणीवपूर्वक वापर करून भारतीय तपास यंत्रणांची दिशाभूल करण्याचा कुटिल डाव या बोटीवरील ५ पाकिस्तानी नागरिकांनी रचला होता. परंतु, भारतीय जवानांच्या तीक्ष्ण नजरेतून ते सुटू शकले नाहीत.

या संशयास्पद बोटीचा थरारक पाठलाग करून जेव्हा तिला अडवण्यात आले आणि तिची झडती घेण्यात आली, तेव्हा आत दडवलेला साठा पाहून भल्याभल्यांच्या पायाखालची जमीन सरकली. तब्बल ५२६ किलो वजनाचे हेरॉईन आणि मेथॅम्फेटामाईन यांसारखे अत्यंत घातक अमली पदार्थ या बोटीत अत्यंत चलाखीने लपवले होते. जागतिक बाजारात या मृत्यूच्या विषाची किंमत तब्बल ३००० कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. विचार करा, हा ३००० कोटी रुपयांचा मृत्यू जर भारताच्या किनाऱ्यावरून देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला असता, तर लाखो तरुणांचे आणि त्यांच्या निष्पाप कुटुंबांचे आयुष्य कायमचे उद्ध्वस्त झाले असते.

या संपूर्ण कारवाईचे जर अत्यंत बारकाईने आणि मुळापासून विश्लेषण केले, तर त्यातून पाकिस्तानची पूर्णपणे बदललेली, हताश आणि भ्याड रणनीती अत्यंत उघडपणे जगासमोर येते. आज पाकिस्तानची अवस्था अशी आहे की, त्यांची देशांतर्गत अर्थव्यवस्था पूर्णपणे रसातळाला गेली असून, त्यांच्या सामान्य जनतेला दोन वेळच्या अन्नाची भ्रांत पडली आहे. अशा आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या देशाला सीमेवर भारताशी थेट समोरासमोर युद्ध लढण्याची कोणतीही लष्करी हिंमत आता उरलेली नाही. त्यामुळेच भारताला अस्थिर करण्यासाठी अमली पदार्थांच्या तस्करीचा आधार घेणे, हाच त्यांचा आता नवा आणि छुप्या युद्धाचा मार्ग बनला आहे. अमली पदार्थांच्या या काळ्या धंद्यातून मिळणारा अफाट पैसा थेट भारतातील दहशतवादी कारवायांसाठी, छुपे अतिरेकी पोसण्यासाठी आणि देशातील तरुण पिढीला व्यसनाधीन करून आतून पोखरून काढण्यासाठी वापरला जात आहे.

आपली मूळ ओळख लपवून, इराणी बोटीचा ढाल म्हणून वापर करणे, हे त्यांच्या अतिशय खोलवर रुजलेल्या सुनियोजित षड्यंत्राचेच एक मोठे आणि विदारक उदाहरण होते. परंतु, भारतीय तटरक्षक दलाची अहोरात्र चालणारी अभेद्य सागरी गस्त आणि गुजरात दहशतवादविरोधी पथकाचे जमिनीवरील अचूक गुप्तचर जाळे यांच्यातील समन्वय इतका अभूतपूर्व आणि भक्कम निघाला की, या ५ पाकिस्तानी तस्करांचा हा महाभयंकर डाव भारताच्या किनाऱ्याला लागण्यापूर्वीच मध्य समुद्रात कायमचा मोडून काढण्यात आला.

या पाचही पाकिस्तानी तस्करांना आणि त्यांच्या बोटीला आता पुढील सखोल कायदेशीर चौकशीसाठी मुंबईत आणण्यात आले आहे. हे ३००० कोटींचे अमली पदार्थ भारतात नेमके कोणासाठी आणले जात होते, याचा शोध घेणे आता तपास यंत्रणांसाठी अत्यंत निकडीचे झाले आहे, कारण या आंतरराष्ट्रीय साखळीचे धागेदोरे थेट आपल्याच गल्लीबोळातील स्थानिक गुन्हेगारांपर्यंत पोहोचलेले असतात. याचेच एक जळजळीत उदाहरण म्हणजे अलिकडेच कल्याणमध्ये उघडकीस आलेले प्रकरण होय. कल्याणमध्ये पोलिसांनी अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यात ५ स्थानिक आरोपींना बेड्या ठोकून त्यांच्यावर थेट अत्यंत कठोर अशा मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

या कारवाईत ९ किलो हेरॉईन, ज्याची किंमत ३ कोटी ८५ हजार रुपये आहे, आणि ३० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. कल्याणची ही स्थानिक घटना आणि अरबी समुद्रातील ३००० कोटींची आंतरराष्ट्रीय घुसखोरी, या दोन्ही घटना वरवर पाहता वेगवेगळ्या वाटत असल्या तरी त्या एकाच मोठ्या आणि भयानक साखळीचा भाग नक्कीच असू शकतात. सीमेपलीकडून येणारा अमली पदार्थांचा महापूर आणि गल्लीबोळात ते विष पसरवणारे स्थानिक दलाल, या दोन्ही आघाड्यांवर व्यवस्थेला आता अत्यंत निर्ममपणे प्रहार करावाच लागेल. जोपर्यंत या संपूर्ण साखळीचा मुख्य सूत्रधार आणि व्यवस्थेत लपून बसलेले पांढरपेशे स्थानिक हस्तक उघडकीस येत नाहीत, तोपर्यंत देशाच्या सुरक्षेला आणि आपल्या युवा पिढीच्या भविष्याला असलेला हा वाढता धोका अजिबात टळणार नाही, हे कटू सत्य आपण स्वीकारायलाच हवे.

- ९५६१५९४३०६

# भारतीय क्रिकेटचा सर्वदूर दबदबा कायम, आशियाई सुवर्ण पदकाचे वेध!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या उपांत्य फेरीत श्रीलंकेला १२४ धावांनी पराभूत करून सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. आता सुवर्णपदकाचा सामना ३ ऑक्टोबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळला जाईल. पाकिस्तानने पहिल्या उपांत्य फेरीत बांगलादेशला ६ गडी राखून पराभूत करून आपले रौप्यपदक मिळवले. कांस्यपदकाचा सामना पहिल्या आणि दुसऱ्या उपांत्य फेरीतील पराभूत संघ, बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यात खेळला जाईल. भारताच्या विजयात ईशान किशन आणि वैभव सूर्यवंशी यांच्यासह पाच खेळाडूंनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### ईशान किशनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले

श्रीलंकेविरुद्धच्या नॉकआऊट सामन्यात ईशान किशनने ४६ चेंडूंमध्ये ८० धावांची धडाकेबाज खेळी केली. या खेळीत त्याने चार चौकार आणि पाच उत्तुंग षटकार ठोकले. जपानच्या फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टूयांवर प्रत्येक फलंदाजाला खेळताना संघर्ष करावा लागत असताना, या धडाकेबाज फलंदाजाने हुशारीने खराब चेंडूंना फटके मारले. या सामन्यात ईशान किशनला पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची संधी मिळाली आणि त्याने इतिहास रचला. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पाचव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना भारतासाठी सर्वोच्च खेळी करणारा तो फलंदाज ठरला. त्याच्या खेळीमुळे भारताला श्रीलंकेसमोर १७० धावांचे लक्ष्य ठेवण्यास मदत झाली.

### वैभव सूर्यवंशीने दिली शानदार सुरुवात

आजचा सामना वैभव सूर्यवंशी खेळेल अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. पण मुख्य प्रशिक्षक व्हीव्हीएस लक्ष्मण आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांनी संजू सॅमसन आणि वैभव सूर्यवंशी यांना अंतिम ११ खेळाडूंमध्ये स्थान दिले. अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन प्रत्येकी ७ धावांवर बाद झाले, पण वैभव सूर्यवंशीने एक बाजू सांभाळली. वैभवने २१ चेंडूंमध्ये ६ चौकार आणि २ षटकारांसह ३८ धावांची धडाकेबाज खेळी करत भारताला पॉवरप्लेमध्ये मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. त्याच्या कामगिरीमुळे इशान किशनचा आत्मविश्वासही वाढला.

### जसप्रीत बुमराहने पहिल्याच षटकात कहर केला

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने श्रीलंकेविरुद्धच्या उपांत्य सामन्यात पहिल्याच षटकात दोन बळी घेत कहर केला. त्याने सलामीवीर सिनेथ जयवर्धने आणि सोहन डी लिवेरा यांना धावा करण्याची संधीच दिली नाही. बुमराहने या सामन्यात दोन षटके गोलंदाजी करून दोन बळी घेतले. त्याने केवळ सात धावा दिल्या.

### अक्षर पटेलनेही कहर केला

गोलंदाजीत जसप्रीत बुमराहला अक्षर पटेलची साथ मिळाली. बुमराहच्या पहिल्याच षटकात दोन बळी घेतल्यानंतर, भारताला डावाच्या सातव्या चेंडूवर आणि अक्षर पटेलच्या डावाच्या पहिल्याच चेंडूवर तिसरा बळी मिळाला. अक्षर पटेलने चौथ्या षटकात आणखी दोन बळी घेऊन श्रीलंकन संघाला शरणागती पत्करायला भाग पाडले. पॉवरप्लेच्या अखेरीस भारताने श्रीलंकेच्या सहा खेळाडूंना बाद केले होते. बुमराह आणि अक्षरच्या प्रत्येकी दोन बळींव्यतिरिक्त, तीन खेळाडू धावबाद झाले, तर उर्वरित दोन बळी अभिषेक शर्माने घेतले.

### क्षेत्ररक्षकांकडून पूर्ण पाठिंबा

भारताने श्रीलंकेविरुद्धच्या उपांत्य सामन्यात तीन खेळाडूंना धावबाद केले. यात रवी बिश्नोई, अक्षर पटेल आणि तिलक वर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. धावा करण्याच्या दबावाखाली, श्रीलंकेचे गोलंदाज प्रभावीपणे स्ट्राइक रोटेट करू शकले नाहीत, ज्यामुळे धावबाद झाले.

### पाकिस्तान - बांगलादेश सामना

आशियाई क्रीडा स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीचे सामने पावसामुळे रद्द झाल्यानंतर, पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तानने बांगलादेशला सहा गडी राखून पराभूत करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. या सामन्यात पाकिस्तानचा कर्णधार साहिबजादा फरहानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसामुळे सामना प्रत्येकी १३ षटकांचा झाला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १३ षटकांत सात गडी गमावून १११ धावा केल्या.

पाकिस्तानने ११.३ षटकांत ११२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. हसन नवाझने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २२ चेंडूंमध्ये २७ धावा केल्या, तर अब्दुल समद पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १५ चेंडूंमध्ये ३० धावांवर नाबाद राहिला. या दोघांनी मिळून ३२ चेंडूंमध्ये नाबाद ५९ धावा करून पाकिस्तानला विजय मिळवून दिला. दुसऱ्या उपांत्य फेरीत भारताचा सामना श्रीलंकेशी होईल. विजयी संघ ३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा सामना करेल. त्याच दिवशी बांगलादेशदेखील कांस्य पदकासाठी खेळेल.

### पाकिस्तानचा डाव

सहा धावांवर पाकिस्तानची पहिली विकेट पडली. कर्णधार साहिबजादा फरहान एका धावेवर बाद झाला. मेहदी हसनच्या गोलंदाजीवर हृदोयने त्याचा झेल घेतला. त्यानंतर १६ धावांवर पाकिस्तानची दुसरी विकेट पडली. नसूम अहमदने माझ सदाकतला हृदोयकरवी झेलबाद केले. तो दोन चौकारांच्या मदतीने सात चेंडूंमध्ये १५ धावा करून बाद झाला. ३८ धावांवर पाकिस्तानची तिसरी विकेट पडली. सॅम अयुब १२ चेंडूंमध्ये २१ धावा करून बाद झाला. मुस्तफिजुरच्या गोलंदाजीवर तन्झिदने त्याचा झेल घेतला. त्यानंतर उस्मान खान १४ धावांवर रिशाद हुसेनच्या गोलंदाजीवर नसूम अहमदकरवी झेलबाद झाला.

### बांगलादेशचा डाव

बांगलादेशला दुसऱ्या षटकात १७ धावांवर पहिला बळी गमवावा लागला. अराफत मिन्हासने तन्झिद हसन तमीमला साहिबजादाकरवी झेलबाद केले. तन्झिद केवळ सात धावाच करू शकला. त्यानंतर २० धावांवर बांगलादेशला दुसरा धक्का बसला. सॅम अयुबने कर्णधार लिटन दासला त्रिफळाचीत केले, जो केवळ दोन धावाच करू शकला. त्यानंतर २१ धावांवर बांगलादेशला तिसरा धक्का बसला. अराफत मिन्हासने परवेझ होसेनला वसीम ज्युनियरकरवी झेलबाद केले, जो केवळ एक धावच करू शकला. ४५ धावांवर बांगलादेशला चौथा धक्का बसला. सुफियान मुकीमने सैफ हसनला पायचीत केले. तो १७ चेंडूंमध्ये केवळ १९ धावाच करू शकला. ९८ धावांवर बांगलादेशला पाचवा धक्का बसला. दोन चौकार आणि चार षटकारांसह २५ चेंडूंमध्ये ४२ धावांची धडाकेबाज खेळी केल्यानंतर तौहीद हृदोय बाद झाला. मुकीमच्या गोलंदाजीवर अयुबने त्याचा झेल घेतला. ९९ धावांवर बांगलादेशला सहावा धक्का बसला. मुकीमच्या गोलंदाजीवर फरहानने मोसादेक होसेनचा झेल घेतला. तो केवळ ११ धावाच करू शकला. १११ धावांवर बांगलादेशची सातवी विकेट पडली. रिशाद होसेन केवळ दोन धावांवर धावबाद झाला. मेहिदी हसन आठ धावांवर नाबाद राहिला. पाकिस्तानकडून सुफियान मुकीमने तीन बळी घेतले. अराफत मिन्हासने दोन बळी घेतले. सॅम अयुबने एक बळी घेतला.

### भारत विंडीज एकदिवसीय मालिका

भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या विक्रमी नाबाद द्विशतकामुळे आणि रोहित शर्माच्या शानदार शतकामुळे भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजला आठ गडी राखून पराभूत केले. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना, वेस्ट इंडिजने तीन शतकांच्या जोरावर ४०५/७ अशी मोठी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात, भारताने ४३.३ षटकांत दोन गडी गमावून ४०६ धावा करत एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील आपले सर्वोच्च लक्ष्य यशस्वीरित्या पार केले.

भारताच्या विजयाचा नायक कर्णधार शुभमन गिल होता, ज्याने १३३ चेंडूंमध्ये २२३ धावांची नाबाद ऐतिहासिक खेळी केली. त्याने ११७ चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद द्विशतक झळकावणारा फलंदाज ठरला. गिलने त्याचा सहकारी इशान किशनचा विक्रम मोडला, ज्याने २०२२ मध्ये बांगलादेशविरुद्ध १२६ चेंडूंमध्ये २०० धावा पूर्ण केल्या होत्या.

### गिलने ११७ चेंडूंमध्ये सर्वात जलद द्विशतक झळकावले

गिलने आपल्या खेळीत २६ चौकार आणि आठ षटकार ठोकले. त्याने सुरुवातीपासूनच वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला. गिलने अवघ्या ६२ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले, जे त्याचे सर्वात जलद एकदिवसीय शतक ठरले. त्यानंतर त्याने आपल्या खेळीचा वेग वाढवला आणि ११७ चेंडूंमध्ये २०० धावा पूर्ण करून इतिहास रचला. एकदिवसीय सामन्यांमधील गिलचे हे दुसरे द्विशतक आहे. यापूर्वी, त्याने २०२३ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध २०८ धावा केल्या होत्या. यामुळे तो एकदिवसीय सामन्यांमध्ये दोन द्विशतके झळकावणारा रोहित शर्मानंतरचा दुसरा फलंदाज ठरला आहे.

### रोहितने ७५ चेंडूंमध्ये शतक झळकावले

दुसऱ्या बाजूला, रोहित शर्मानेही आपल्या अनुभवाचा उत्कृष्ट वापर केला. त्याने अवघ्या ७५ चेंडूंमध्ये १०१ धावा केल्या. रोहितने आपल्या आक्रमक फटक्यांनी उत्कृष्ट टायमिंग दाखवले आणि गिलसोबत मिळून भारताला वेगाने लक्ष्याच्या दिशेने नेले. आपल्या या खेळीदरम्यान रोहितने आणखी एक मोठा टप्पा गाठला. एकदिवसीय क्रिकेटमध्ये १२,००० धावा पूर्ण करणारा तो जगातील सातवा आणि तिसरा भारतीय फलंदाज ठरला. त्याच्या आधी सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांनी हा पराक्रम केला आहे. एकदिवसीय सामन्यांमधील हे रोहितचे ३५ वे शतक होते.

### गिल-रोहितची २५५ धावांची विक्रमी भागीदारी

४०६ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना, गिल आणि रोहितने भारताला एक मजबूत सुरुवात करून दिली. या दोघांनी अवघ्या २६.२ षटकांत पहिल्या विकेटसाठी २५५ धावा जोडल्या. रोहित १०१ धावांवर बाद झाल्यावर ही भागीदारी संपुष्टात आली. रोहित बाद झाला तेव्हा भारताला विजयासाठी १५१ धावांची गरज होती आणि गिल खेळपट्टीवर होता. त्यानंतर गिलने डाव सावरला आणि शेवटपर्यंत नाबाद राहून भारताला एक ऐतिहासिक विजय मिळवून दिला. भारताने १२ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या. गिलने ३८ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले, तर रोहितने अवघ्या ३२ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. दोन्ही संघांच्या आक्रमक फलंदाजीचा अंदाज यावरून लावता येतो की, भारताने २२ व्या षटकात एकही गडी न गमावता २०० धावा पूर्ण केल्या. एकदिवसीय सामन्यात ३५० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठताना सलामीच्या जोडीने २०० धावांचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ होती. भारताने एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्येचा पाठलाग पूर्ण केला. वेस्ट इंडिजच्या ४०५/७ धावसंख्येला प्रत्युत्तर देताना, भारताने ४०६/२ धावा करून एकदिवसीय क्रिकेटमधील आपल्या सर्वोच्च धावसंख्येचा पाठलाग पूर्ण केला. भारताचा यापूर्वीचा एकदिवसीय क्रिकेटमधील यशस्वी सर्वोच्च धावसंख्येचा पाठलाग २०१३ मध्ये जयपूर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३६२/१ असा होता. एकदिवसीय क्रिकेटमधील यशस्वी सर्वोच्च धावसंख्येच्या पाठलागांच्या यादीत भारत आता दक्षिण आफ्रिकेच्या मागे दुसऱ्या क्रमांकावर आहे. दक्षिण आफ्रिकेने २००६ मध्ये जोहान्सबर्ग येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४३५ धावांचे लक्ष्य पूर्ण केले होते.

### वेस्ट इंडिजच्या तीन फलंदाजांनी शतके झळकवली

यापूर्वी, वेस्ट इंडिजने शानदार फलंदाजी केली. जॉन कॅम्पबेल, शाई होप आणि अमीर जांगू यांनी शतके झळकावली. कॅम्पबेलने ६८ चेंडूंमध्ये नऊ चौकार आणि पाच षटकारांसह १०१ धावा केल्या. कॅम्पबेलनंतर शाई होपने डावाची सूत्रे हाती घेतली आणि ९४ चेंडूंमध्ये १०४ धावा केल्या. त्याच्या खेळीत आठ चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. दरम्यान, अमीर जांगूने अवघ्या ६९ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले आणि ११४ धावा केल्या. त्याने १३ चौकार आणि तीन षटकार मारले. एकाच एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजच्या तीन फलंदाजांनी शतके झळकावण्याची ही पहिलीच वेळ होती. या तिघांच्या खेळीमुळे वेस्ट इंडिजने ४०५/७ अशी धावसंख्या उभारली आणि आपला ३८९ धावांचा पूर्वीचा सर्वोत्तम एकदिवसीय स्कोअर मागे टाकला.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# उमरेड एम.आय.डी.सी.मध्ये विषारी वायू आणि दुर्गंधीचे साम्राज्य ?

## नागरिकांच्या आरोग्याशी जीवघेणा खेळ, प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, धुरखेडा ग्रामपंचायतीचा एल्गार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालयाला दिले निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**



उमरेड औद्योगिक विकास महामंडळ एम.आय. डी.सी. परिसरातील पायरोलिसीस प्रकल्प, प्लांट आणि इतर उद्योगांमधून होणाऱ्या तीव्र दुर्गंधी तसेच संभाव्य वायू प्रदूषणामुळे धुरखेडा आणि लगतच्या परिसरातील नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे. सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य आणि कामगारांच्या जीवाशी सुरू असलेल्या या गंभीर खेळाविरोधात गट ग्रामपंचायत धुरखेडा यांनी आक्रमक भूमिका घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे निवेदनाद्वारे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीने दिलेल्या पत्रात नमूद केल्यानुसार, उमरेड औद्योगिक क्षेत्रातील पायरोलिसीस प्रकल्प व इतर काही उद्योगांमधून वारंवार प्रचंड तीव्र दुर्गंधी सुटत आहे. अनेकदा धूर आणि दुर्गंधीमुळे स्थानिक नागरिकांना डोळ्यांचे आजार, श्वसनाचा त्रास आणि मळमळीसारख्या गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**ना-हरकत प्रमाणपत्र रद्द किंवा प्रलंबित तरीही कंपन्या सुरू प्रशासनाच्या आशीर्वादाने बेकायदेशीर कारभार..**

अतिशय धक्कादायक बाब म्हणजे, काही उद्योगांचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द किंवा प्रलंबित झाले असतानाही हे उद्योग रात्रीच्या वेळी चोरट्या मार्गाने सुरू ठेवले जात असल्याचे निवेदनात स्पष्ट झाले आहे. परवानग्या नसताना किंवा मुदत संपलेली असतानाही हे प्रदूषणकारी प्रकल्प सर्रास सुरू ठेवून प्रशासनाच्या नाकाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.

**ग्रामपंचायत धुरखेडा यांच्या मुख्य आणि कडक मागण्या:**

**तात्काळ प्रत्यक्ष पाहणी:**
पायरोलिसीस प्रकल्प व इतर संशयित उद्योगांची तात्काळ प्रत्यक्ष पाहणी व तपासणी करण्यात यावी. हवेच्या गुणवत्तेची व चिमणी उत्सर्जनाची तपासणी: निष्काळजी उद्योगांमधून होणाऱ्या वायू प्रदूषणाची तातडीने वैज्ञानिक तपासणी व्हावी.

**रात्रीच्या वेळी अचानक तपासणी:**
रात्रीच्या वेळी छुप्या मार्गाने चालणाऱ्या उत्पादनांवर आळा घालण्यासाठी अचानक धाडी टाकून तपासणी करण्यात यावी.

**उत्पादन तात्काळ बंद करा:**
ना-हरकत प्रमाणपत्र रद्द, प्रलंबित असणाऱ्या किंवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यरत नसणाऱ्या उद्योगांचे कामकाज तात्काळ थांबवण्यात यावे.

**दोषींवर कठोर गुन्हे दाखल करा:**
नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर पर्यावरण कायद्यानुसार कठोर कारवाई करून उत्पादन बंद करण्याचे आदेश द्यावेत.

**नागरिकांचा सवाल: दुर्घटनेनंतरच प्रशासन जागे होणार का ?**
एकीकडे स्थानिक नागरिक आणि कामगार विषारी हवेत गुदमरून जात असताना प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा प्रशासन नक्की कोणाचे भले करत आहे. असा संतप्त सवाल आता धुरखेडावासीय विचारत आहेत. वेळीच या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केल्यास आणि तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास, नागरिकांच्या आणि कामगारांच्या जीवाला होणाऱ्या धोक्याची सर्वस्वी जबाबदारी प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांची असेल, असा इशाराही दिला जात आहे.

# समाजातील सर्वच व्यक्तींनी समाजोपयोगी व संघटनात्मक समाजकार्य करावे!

## आम. विजयभाई गिरकर, माजी राज्यमंत्री

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**



समाजातील सर्वच व्यक्तींनी समाजोपयोगी व संघटनात्मक समाजकार्य केल्यास त्या त्या समाजाची क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही, असे मार्गदर्शन रोहिदास समाज पंचायत संघ व आदर्श शिक्षण समितीचे तहहयात विश्वस्त समाजसेवक शांताराम गोवळकर यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त मुलुंड येथे नुकत्याच आयोजित केलेल्या, सहस्रचंद्र दर्शन सोहळ्यात आमदार व माजी समाजकल्याण राज्यमंत्री मा. विजयभाई गिरकर यांनी केले. आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या समाजाला मोठे करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने महापुरुषांच्या कर्तबगारिंची आठवण करायला हवी. त्यांचे आदर्श समोर ठेवूनच तसे कार्य केल्यास समाजात बदल नक्कीच होईल. असेही भाई गिरकर पुढे आपल्या भाषणात म्हणाले व त्यांनी गोवळकरांच्या समाजकार्याची प्रशवसा केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संदेश गोवळकर यांनी वडील शांताराम गोवळकर यांच्या कायार्चा परिचय करून दिला त्यात आम्ही आजपर्यंत कसे दिवस काढले ते सांगून जशी साथ आम्ही बाबांना त्या काळात दिली, तशीच साथ आम्ही तिन्ही मुले शेवट पर्यंत त्यांना देऊ असेही सांगितले. आणि उपस्थित सर्व पाहूण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शांताराम गोवळकर यांच्या काही आठवणीना उजाळा देण्यासाठी आयकरचे निवृत्त डेप्युटी कमिशनर - हरीश केळकर, कुडाळचे नायब तहसीलदार - प्रदीप पवार, संतोष भोईर, रोहिदास समाज पंचायत संघाचे अध्यक्ष - मयुर देवळेकर, राजाराम पवार, अतुल धयाटकर व आदर्श शिक्षण समिती चे माजी अध्यक्ष - रामचंद्र जाधव आदींची भाषणे झाली.

यावेळी 'सा. प्रकट महाराष्ट्र व यू - ट्युब वृत्तवाहिणीच्या' वतीने स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन शांताराम गोवळकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नेहा धयाटकर ही चाटर्ड अकाउंटिंग ची परीक्षा उत्तम मार्कांनी पास झाल्याबद्दल गिरकर यांच्याहस्ते तीचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना गोवळकर यांनी शालेय जीवनापासून ते इथपर्यंत कसा पोहोचलो त्याची काही उदाहरणं देऊन प्रसगांची माहिती दिली. आणि आता पर्यंतच्या आयुष्यातील चढ - उतारावर प्रकाश टाकला. माझी पत्नी सुप्रिया मुलगी -स्वप्ना धयाटकर, मुलगा - संदेश व संकल्प या सर्वांच्या प्रेमामुळे आणि सहकार्यामुळे, आपण सर्व नातेवाईक व मित्रपरिवार यांच्या शुभेच्छामुळे व प्रेमामुळेच मी आज वयाच्या ८० वर्षापर्यंत पोहोचलो आहे. शिवाय आपण इलक्या मोठ्या संख्येने मला शुभेच्छा देण्यासाठी आपला अमूल्य वेळ खर्चून उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे. संकल्प गोवलकर यांनी उपस्थित पाहुणे व सर्व शुभे शुभेच्छूकांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - दत्ताराम दळवी यांनी केले.

## डॉ. सौरभ मुकेवार यांना 'वर्ल्ड कप ऑफ एन्डोस्कोपी' पुरस्काराने सन्मानित

### केपटाऊन येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत यकृताला बायपास करणाऱ्या असामान्य रक्तवाहिन्यांवरील उपचारांचे केले सादरीकरण




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रसाठी अभिमानास्पद कामगिरी ठरावी, अशी उल्लेखनीय कामगिरी मिडास रुग्णालयाचे संचालक आणि ज्येष्ठ गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ मुकेवार यांनी केली आहे. दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन येथे आयोजित वर्ल्ड एन्डोस्कोपी ऑर्गनायझेशनच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांना प्रतिष्ठेच्या 'वर्ल्ड कप ऑफ एन्डोस्कोपी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# वाडीत स्वच्छतेचा जागर

## कचऱ्याच्या विळख्यातून महामार्गाला मुक्ती, वाडीत स्वच्छतेचा जागर!

### 'एक दिवस, एक तास, एक साथ'चा नारा, नगर परिषद, जेएनएआरसी व वाडी पत्रकार संघाचा संयुक्त पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**



केंद्र शासनाच्या 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानांतर्गत 'एक दिवस, एक तास, एक साथ' या संकल्पनेतून वाडीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. वाडी नगर परिषद, जवाहरलाल नेहरू अल्युमिनियम रिसर्च सेंटर आणि वाडी पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मोहिमेत लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व सफाई कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मुख्याधिकारी विनोद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी वाडी पोलीस ठाण्यासमोर मोहिमेला सुरुवात झाली. यावेळी उपनगराध्यक्ष कल्पना सगदेव, आरोग्य सभापती सरिता यादव, पाणीपुरवठा सभापती विजय मेंढे, शिक्षण सभापती ज्योती भोरकर, वाडी पत्रकार संघाचे संस्थापक प्राचार्य सुभाष खाकसे, सौरभ पाटील, स्वच्छता ब्रँड अँम्बेसेडर नरेशकुमार चव्हाण यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

अमरावती महामार्गावरील पोलीस ठाणे व डिफेन्स सुरक्षा भिंतीलगत मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा हटवून राणी लक्ष्मीबाई उद्यानापर्यंतचा परिसर स्वच्छ करण्यात आला. कचऱ्यामुळे नागरिक व वाहनचालकांना होणारा दुर्गंधीचा त्रासही यामुळे कमी झाला. स्वच्छ व सुंदर वाडीच्या निर्मितीसाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक असून, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छता राखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपनगराध्यक्ष कल्पना सगदेव यांनी केले.

या मोहिमेत स्वच्छता अभियंता सुषमा भालेकर, स्वच्छता निरीक्षक रंजित सोनेकर, मुकेश महातो, आशिष गुंडुकवार, आदर्श तंवर यांच्यासह नगर परिषद अधिकारी, कर्मचारी व सफाई कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# दुष्काळी परिस्थितीमुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




राज्यात दुष्काळाची छाया पसरली असल्याने महावितरणने संपूर्ण तांत्रिक यंत्रणेला हायअलर्ट देत शासनाच्या दुष्काळ उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे सक्त आदेश दिले आहे. याबाबत महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक जारी केले आहे.

यंदाच्या जून महिन्यापासून राज्यात पर्जन्यमानामध्ये मोठी तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सोबतच शेती पिकांचे नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राज्य शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार महावितरणने देखील राज्यभरातील तांत्रिक यंत्रणा सतर्क केली आहे.

मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या आदेशानुसार महावितरणचे संचालक धनजंय औंढेकर (संचालन), योगेश गडकरी (वाणिज्य), सचिन तालेवार (प्रकल्प), राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह सर्व कार्यकारी संचालकांनी विविध परिमंडलांमध्ये तातडीने दौरे करून दुष्काळी परिस्थितीत कृषिपंपांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी विविध तांत्रिक कामांचा आढावा घेतला तसेच वीजयंत्रणेची पाहणी करून आवश्यक उपायांचे निर्देश दिले.

यासोबतच महावितरणने सर्व क्षेत्रीय कार्यालयातील अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचऱ्यांना आपापल्या मुख्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

दुष्काळी परिस्थितीमध्ये प्रामुख्याने शेतीसह इतर सर्व ग्राहकांसाठी महत्त्वाचा असलेला वीजपुरवठा सुरळीत राहील याची विशेष खबरदारी घ्यावी. एखाद्या कारणामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्थेतून किंवा तातडीने दुरुस्ती कामे करून तो पूर्ववत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामात हयगय करणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### तुमसर तालुक्यातील उमरवाडा येथे शासन निर्णयाची होळी

### शेतकऱ्यांनी सरकार विरोधात घोषणाबाजी करून नाराजी व्यक्त केली



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
शासनाने खरीप हंगाम २०२६ साठी जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत भंडारा जिल्ह्यातील तुमसर व मोहाडी तालुक्यांचा समावेश न केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ उमरवाडा (बोरी)येथील शेतकऱ्यांनी सरकार विरोधात घोषणाबाजी करून शासन निर्णयाच्या प्रतीची होळी करून निषेध नोंदविला. शासनाने जाहीर केलेल्या यादीत भंडारा जिल्ह्यातील भंडारा, पवनी आणि लाखांदूर या तीन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, तुमसर व मोहाडी तालुक्यांतील अनेक भागांमध्ये पावसातील खंड, धान पिकावरील मावा ,तुडतुडा ,करपा सारख्या रोगामुळे नुकसानकारक परिस्थिती निर्माण झाली असतानाही तुमसर मोहाडी तालुक्याला दुष्काळ जाहीर न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दुष्काळाचे मूल्यांकन केवळ पर्जन्यमानाच्या निकषावर न करता प्रत्यक्ष पीकस्थिती, पावसातील खंड, पिकांचे नुकसान, उपलब्ध पाणीसाठा आणि शेतातील वस्तुस्थिती यांचा सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. तुमसर व मोहाडी तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने प्रत्यक्ष पाहणी करून निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली. तुमसर व मोहाडी तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याची मागणी यापूर्वीही शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाने या मागणीची तातडीन दखल घेऊन दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी सवलती व मदतीचा लाभद्यावा, अशी मागणी उमरवाडा नवरगाव बोरी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी नंदलाल गुरुवे माजी सरपंच उमरवाडा, प्रजेस लाडसे सरपंच नवरगाव, विनोद उपरीकर माजी ग्रामपंचायत सदस्य उमरवाडा, सुरेंद्र बोरकर उमरवाडा, गिरडकर माजी पोलीस पाटील उमरवाडा, रवी कांबळे, परमानंद नगरधने व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वनस्पतीशास्त्राची विद्यापीठस्तरीय कार्यशाळा संपन्न





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
रा. तू. म. नागपूर विद्यापीठातर्फे २०२६-२७ या शैक्षणिक सत्रापासून विज्ञान स्नातक करीता ३-२-१ ही नवीन अभ्यासक्रम पद्धती लागू केलेली आहे. सदर अभ्यासक्रमाबाबत विषय शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, नियमावली कळावी या उद्देशाने प्राध्यापकांसाठी एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ ला आयोजन करण्यात आले होते. दादा रामचंद बाखरू सिंधू महाविद्यालय नागपूर, धरमपेठ म. पा. देव विज्ञान महाविद्यालय नागपूर, भालेराव विज्ञान महाविद्यालय सावनेर येथील वनस्पतीशास्त्र विभाग आणि रा.तू. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर वनस्पतीशास्त्र अभ्यासमंडळ यांचे संयुक्त विद्यमाने सिंधू महाविद्यालयात या कार्यशाळेचे आयोजन केल्या गेले.

उद्घाटन सत्राचे अध्यक्षपद डॉ. बालाजी राजूरकर यांनी भूषविले तर सिनेट आणि व्यवस्थापन सदस्य डॉ. योगेश भुते मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. चर्चासत्राचे समन्वयक डॉ. विलास डोईफोडे, सहसमन्वयक, प्राचार्य डॉ. पितांबर हुमणे, आयोजन सचिव डॉ. राजकुमार खापेकर, डॉ. महेश कावळे, डॉ. मौसमी भोवाल यांनी उपरोक्त नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमाविषयी सखोल आणि प्रभावी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे उपस्थित सर्व प्राध्यापकांनी गटचर्चेत सक्रिय सहभाग घेऊन महत्वाच्या सूचना केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. खापेकर तर संचालन व आभारप्रदर्शन डॉ. संदीप हाते यांनी केले. विद्यापीठ कक्षेतील सत्तर प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग नोंदवून वेळोवेळी अशा आयोजनाची इच्छा व्यक्त केली. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक डॉ. रुपेश बडेरे, डॉ. व्ही. एम. पेंडसे, डॉ. एस. पी. डोंगरे, डॉ. अश्वजित फुलझेले, डॉ. नयना शिरभाते, डॉ. प्राची लांबट, डॉ. मेघा भांबरी, डॉ . परेश निनावे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### प्रकाश मारोती दांडगे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
प्रकाश मारोती दांडगे यांचे वयाच्या ७७व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्यावर उद्या, दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता अंबाझरी घाट, नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

थोडक्यात

## गट ग्रामपंचायत खंडाळा (पिपरी )अंतर्गत येणाऱ्या खंडाळ्याचा राजा मस्कऱ्या गणपतीचे थाटात आगमन

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

खात - रेवराल जिल्हा परिषद क्षेत्रातील गट ग्रामपंचायत खंडाळा(पिपरी) अंतर्गत येणाऱ्या खंडाळा गावात सलग ६७व्या वर्षी विराजमान होणाऱ्या 'खंडाळ्याचा राजा मस्कऱ्या' गणपतीचे



मंगळवारी (दि. २९) भक्तिमय वातावरणात आगमन झाले. हनुमान मंदिरापासून गणपती स्थापना परिसरापर्यंत काढण्यात आलेल्या मिरवणुकीत शारदा भजन मंडळाच्या ढोलकीच्या तालावर भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मिरवणुकीमुळे संपूर्ण गावात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

गणेशोत्सवानिमित्त दहा दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लहान मुलांसाठी खेळ, बुद्धिमत्ता चाचणी तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यासोबतच शारदा भजन मंडळ आणि हनुमान भजन मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. 'खंडाळ्याचा राजा मस्कऱ्या' गणपतीची परंपरा अनेक वर्षांपासून गावकऱ्यांनी जपली आहे. बाल गणेश उत्सव मंडळ यांच्या सहकार्याने गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी गावातील नागरिक, युवक आणि गणेशभक्त आपापल्या परीने सहकार्य करण्याचे नियोजन करीत आहेत. परंपरा आणि भक्तीचा हा उत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेतला आहे.

## वाकेश्वर येथील शिव हायटेक रोपवाटिकेला तोंडलीच्या जि.प शाळेच्या विद्यार्थ्यांची ज्ञानवर्धक भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शेती, निसर्गसंवर्धन आणि उद्योजकतेची माहिती मिळावी, या उद्देशाने जि.प. प्राथमिक शाळा तोंडलीच्या विद्यार्थ्यांनी वाकेश्वर येथील शिव हायटेक रोपवाटिकेला शैक्षणिक क्षेत्रभेट दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी रोपवाटिकेचे संस्थापक कार्तिक घिवतोंडे यांची मुलाखत घेतली. विद्यार्थ्यांनी रोपवाटिकेची स्थापना करण्यामागील उद्देश, विविध रोपांची निर्मिती, लागवडीची पद्धत, पाणी व्यवस्थापन, रोपांची निगा तसेच रोपवाटिकेमुळे परिसरातील शेतकऱ्यांना होणारा फायदा याविषयी विविध प्रश्न विचारले.

रोपवाटिकेत मिरची, वांगी, कोबी यांसह विविध भाजीपाला पिकांची तसेच विविध फुलांची रोपे तयार केली जातात. ही रोपे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिली जात असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होत आहे. विशेष म्हणजे, सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतल्यानंतरही आपल्या परिसरातील शेतकऱ्यांसाठी काहीतरी उपयुक्त कार्य करण्याच्या उद्देशाने रोपवाटिका उभारण्याचा कार्तिक घिवतोंडे यांचा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांनी विद्यार्थ्यांना रोपांची निर्मिती, लागवड, पाणी देण्याची योग्य पद्धत आणि रोपांची काळजी याबाबत सखोल माहिती दिली. तसेच निसर्ग आणि पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्ष व रोपांचे महत्त्वही समजावून सांगितले. या ज्ञानवर्धक आणि अनुभवाधारित उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल रोपवाटिकेचे संस्थापक कार्तिक घिवतोंडे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या माध्यमातून शिक्षण देण्याच्या या उपक्रमाचे त्यांनी अभिनंदन केले. यावेळी शाळेचे सहशिक्षक निलेश जाधव उपस्थित होते. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना शेती, रोपवाटिका, पर्यावरणसंवर्धन, उद्योजकता आणि स्थानिक व्यवसाय यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. पाठ्यपुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष जीवनाशी जोडणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

## सत्य-अहिंसा व मानवप्रबोधनाच्या कार्याची दखल, सुरेश फलके यांचा सन्मान

### श्रीमद्भगवद्गीतेतील जीवनमूल्यांचा प्रसार आणि मूल्यशिक्षणासाठी निःस्वार्थ योगदान



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

सत्य, अहिंसा, समानता, व्यसनमुक्ती आणि मानवतावादी विचारांचा समाजात प्रसार करून सुसंस्कार रुजविण्यासाठी केलेल्या निःस्वार्थ कार्याची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार सुरेश फलके (गुरुजी) यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. श्री गोपाळ आश्रम, श्री क्षेत्र जाळीचा देव यांच्या वतीने आयोजित या सन्मान सोहळ्यात द्वारकाधीश मंदिर वाडी समितीचे पदाधिकारी नरेंद्र आमदरे व विजय भरबत यांच्या हस्ते फलके यांचा सत्कार करण्यात आला. फलके गुरुजी यांनी सत्य, अहिंसा, समानता, व्यसनमुक्ती तसेच मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये मूल्यशिक्षणाची जाणीव निर्माण व्हावी, तसेच श्रीमद्भगवद्गीतेतील जीवनमूल्ये समाजापर्यंत पोहोचावीत, यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. मानवजातीला सुसंस्कारित करण्याच्या या निःस्वार्थ कार्यातील त्यांच्या योगदानाबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत द्या; अन्यथा तीव्र आंदोलन!

### सलील देशमुख यांचा इशारा, शरद पवारांच्या १७ मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून, पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले असताना शासनाने केवळ दुष्काळ जाहीर न करता प्रत्यक्ष मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागपूर ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष सलील देशमुख यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार



यांनी राज्य शासनाकडे मांडलेल्या १७ मागण्या तातडीने मान्य कराव्यात; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यासंदर्भात सलील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली नागपूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी चंद्रशेखर कोल्हे, अविनाश गोतमारे, किशोर गजबे, वैशाली टालाटूले, अंजली साळवे, दिनेश साळवे, दिनेश बंग, गणेश चन्ने, कपिल वानखेडे, नाना केणे, विजय चिकटे, सचिन आमले, सुनील कापसे, गौरव गजघुमे, अभिषेक सोमकुवर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी राज्य शासनाकडे १७ तातडीच्या मागण्या केल्या आहेत. यामध्ये वंचित तालुके दुष्काळग्रस्त घोषित करणे, संपूर्ण जमीन महसूल व वीज बिले माफ करणे, शेतकरी व बचत गटांची कर्जे माफ करणे, शाळा-महाविद्यालयांचे शुल्क माफ करणे तसेच मनरेगाचे निकष शिथिल करून मोठ्या प्रमाणात रोजगाराची कामे सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी व शेतमजुरांना प्रति कुटुंब २५ किलो मोफत धान्य, शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी एक लाख रुपये आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये थेट आर्थिक मदत देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या पशुधनासाठी अनुदान व आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे तसेच दसरा-दिवाळीपूर्वी दुष्काळग्रस्तांना मदत त्यांच्या खात्यात जमा करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी सलील देशमुख यांनी केली.

शासन व प्रशासनाने १७ मागण्यांची तातडीने दखल घेऊन त्यांची अंमलबजावणी केली नाही, तर नागपूर ग्रामीणच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष करण्यात येईल, असा इशारा सलील

# आगामी पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांना उमेदवारी द्या!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/पुणे**

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर) हा पारंपारिकदृष्ट्या सुशिक्षित आणि वैचारिक मतदारांचा बालेकिल्ला राहिला आहे. आज या ५ जिल्ह्यांतील लाखो पदवीधर, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, आयटी व कंत्राटी कामगार आणि सुशिक्षित शेतकरी तरुण अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. प्रस्थापित नेत्यांनी पदवीधरांचे प्रतिनिधित्व केवळ कागदावर ठेवल्यामुळे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील तरुण



वर्गामध्ये सत्ताधाऱ्यांविरोधात प्रचंड असंतोष असून त्यांना एका आक्रमक, अभ्यासू आणि रस्त्यावर उतरून लढणाऱ्या युवा नेतृत्वाची तीव्र गरज भासत असल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांचे नाव पुणे पदवीधर मतदारसंघासाठी सर्वाधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि विजयी ठरू शकणारे आहे. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाचही जिल्ह्यांतील युवक काँग्रेस, एनएसयूआय आणि स्थानिक युवा संघटनांवर शिवराज मोरे यांची मजबूत पकड आहे. पाचही जिल्ह्यांच्या प्रत्येक तालुक्यात त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचे आणि सुशिक्षित पदवीधरांचे सक्रिय नेटवर्क कार्यरत आहे.

लाखो स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे प्रश्न असोत, भरती परीक्षांमधील घोटाळे असोत, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची फी माफी असो किंवा सुशिक्षित बेरोजगारांचे आंदोलन असो, शिवराज मोरे यांनी सातत्याने रस्त्यावर उतरून लाठ्या खाल्ल्या आहेत आणि प्रशासनाला जाब विचारला आहे. पुण्यातील अभ्यासिकांपासून ते ग्रामीण भागातील पदवीधरांपर्यंत त्यांची थेट ओळख 'आपला हक्काचा आवाज' अशी निर्माण झाली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ही केवळ भाषणांवर नव्हे, तर सूक्ष्म व्यवस्थापन आणि मतदार नोंदणीवर जिंकली जाते. शिवराज मोरे यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेसने ५ जिल्ह्यांत हजारो पदवीधरांचा थेट आणि विश्वासार्ह संपर्क उभा केला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा नवसंजीवनी देण्याची आणि महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचा स्वतंत्र व भक्कम व्होट-शेअर सिद्ध करण्याची हीच योग्य वेळ आहे. एका लढाऊ युवा चेहऱ्याला संधी दिल्यास संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील तरुणांमध्ये काँग्रेस पक्षाविषयी प्रचंड सकारात्मक संदेश जाईल.

महाविकास आघाडीच्या जागावाटपात काँग्रेस पक्षाने हा मतदारसंघ आपल्याकडेच आग्रहाने मागून घ्यावा आणि शिवराज मोरे यांना या मतदारसंघातून उमेदवारी देऊन तरुण पदवीधरांचे नेतृत्व विधानपरिषदेत पाठवावे, ही महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांची, लाखो कार्यकर्त्यांची आणि सुशिक्षित तरुणांची तीव्र भावना आहे, असे निवेदन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना निवेदन देण्यात आले.

## स्वच्छता पंधरवाडा अभियान अंतर्गत चाचेर शाळेत विविध उपक्रमांची पर्वणी

### आरोग्य तपासणीपासून स्वच्छता अभियानापर्यंत विविध उपक्रम, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या स्वच्छता पंधरवडा अभियान अंतर्गत पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि कला-कौशल्याशी संबंधित विविध उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. या उपक्रमांची सुरुवात विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने करण्यात आली. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे तसेच आरोग्याबाबत त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने आरोग्य तपासणी करण्यात आली.

चित्रकला व निबंध स्पर्धा, इको क्लबच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. चित्रकला, निबंध व रांगोळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशप्रेम, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचे संदेश दिले. स्वच्छता अभियानात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाळेचा परिसर स्वच्छ केला. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला,





कल्पनाशक्तीला आणि सामाजिक जाणीवेला चालना मिळाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक वृंद रविंद्र घुगे, भारती साखरकर, संगीता बालकोटे, प्रिती खंगार, शिल्पा उकुड्डे, परविन शेख, रुचिला खंडाईत व नेहा निमजे यांनी मोलाचे सहकार्य केले.

आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, कला आणि देशभक्तीचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमांमुळे चाचेर शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## जिल्हास्तरीय मुख्याध्यापकांचे संमेलन व सत्कार

### कमला नेहरू महाविद्यालय नागपूर येथे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/काटोल**

अखिल महाराष्ट्र शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणे व विदर्भ मुख्याध्यापक संघाशी संलग्न असलेले नागपूर जिल्हा ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे वतीने जिल्हा स्तरीय मुख्याध्यापकांचे सम्मेलन व सेवानिवृत्त झालेल्या मुख्याध्यापकांचे सत्कार ३ ऑंक्टोबरला सकाळी ११ वा.कमला नेहरू महाविद्यालय सक्करदरा नागपूर येथे होत आहे. कार्यक्रमचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी अध्यक्ष मारोती खेडेकर, विशेष अतिथी पदवीधर आमदार अभिजित वंजारी,उद्घाटक शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचे हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला माजी प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे, विदर्भ अध्यक्ष समीर देवतळे, राज्य संघटक नरेशचंद्र वाळके आदी उपस्थित राहणार आहेत.

अशी माहिती जिल्हा अध्यक्ष विलीन आरघोडे,सचिव अतुल देशमुख,कार्याध्यक्ष हरिभाऊ खोडे, कोषाध्यक्ष चंदा खुपसरे, प्रसिद्धी प्रमुख सज्जन पाटील यांनी दिली. कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील आजी माजी मुख्याध्यापक, प्राचार्य संबंधित मंडळींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवहान आयोजकांनी केले आहे.

# आगीने संसाराची राखरांगोळी; आमदार चरणसिंग ठाकूर यांचा मदतीचा हात

## दावसा येथील अनिल फुके कुटुंबाला २० हजारांची तातडीची मदत, शासकीय मदतीसाठी अधिकाऱ्यांशी चर्चा





**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील दावसा येथे काही दिवसांपूर्वी अनिल फुके यांच्या घराला आग लागून घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य आगीत जळून खाक झाले. या दुर्घटनेत फुके कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असून, त्यांच्यावर अचानक आर्थिक संकट ओढवले आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी फुके कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन आगीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला.

आगीमुळे घरातील संपूर्ण साहित्य जळून नष्ट झाल्याने कुटुंबाला तातडीने मदतीची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन नुकसानीचा तातडीने पंचनामा करून शासनाच्या नियमानुसार मदत मिळवून देण्यासाठी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी संबंधित एसडीओ तसेच एमएसईडीसीएलच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

दरम्यान, संकटाच्या काळात फुके कुटुंबाला आधार मिळावा म्हणून आमदार चरणसिंग ठाकूर यांच्यावतीने २० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच शासनाच्या माध्यमातून कुटुंबाला मिळणाऱ्या मदतीसाठी पुढील काळात आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले.

घरातील संपूर्ण संसार आगीत जळून खाक झाल्याने फुके कुटुंबावर मोठे संकट आले आहे. त्यामुळे शासनाकडून नियमानुसार मिळणारी मदत तातडीने मिळावी, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी राजुभाऊ हरणे, दिलेशजी ठाकरे, नितीनजी डेहनकर, भूषणजी भोयर, अक्षय विरखडे, निलेशजी सावरकर, जयश्रीताई सातंगे, लीलाधरजी भड, नीरजजी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## खुर्सापार प्रवेशद्वार, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर येथे नव्या पर्यटन हंगामास प्रारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

मध्यप्रदेश व महाराष्ट्र सिमा लगत असलेल्या खुर्सापार १ ऑक्टोबर पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर अंतर्गत खुर्सापार प्रवेशद्वारावर पेंच व्याघ्र प्रकल्प संचालक रमेश कुमार व



उपसंचालक अक्षय गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक वनसंरक्षक पूजा लिंबगावकर यांच्या नियोजनाने नव्या पर्यटन हंगामाची सुरुवात करण्यात आली. सदर प्रवेशद्वाराचे उद्घाटन बांद्रा, गर्रा, खुर्सापार गट ग्रामपंचायतीच्या सरपंच कल्पना भलावी यांच्या हस्ते करण्यात आले.

आज सकाळी ६ वाजता पहिल्या जिप्सीला पेंचच्या जंगलात प्रवेश देण्यात आला. पहिल्याच दिवशी पर्यटकांना वाघाचे दर्शन झाल्याने खुर्सापार प्रवेशद्वारातून यावर्षीच्या पर्यटन हंगामाची चांगली सुरुवात झाली आहे. वन परिक्षेत्र अधिकारी सागर केदार यांनी पर्यटकांना आवाहन केले की, येणाऱ्या पर्यटन हंगामात अधिकाधिक पर्यटकांनी खुर्सापार प्रवेशद्वाराचा लाभ घ्यावा व ऑनलाईन बुकिंग करून सफारीचा आनंद घ्यावा. ऑनलाइन बुकिंगसाठी महा फॉरेस्टच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. या पर्यटन प्रवेशद्वारामुळे परिसरातील स्थानिक नवयुवकांना जिप्सी चालक, निसर्ग मार्गदर्शक तसेच इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. भविष्यात या पर्यटन उपक्रमामुळे रोजगाराच्या संधींमध्ये आणखी वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. सफारीदरम्यान सर्व पर्यटक, जिप्सी चालक आणि निसर्ग मार्गदर्शकांनी वन विभागाने निर्धारित केलेल्या सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच वन्यजीव व वनपरिसंस्थेच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वयाच्या शंभरीच्या उंबरठ्यावरही आरोग्याचा उत्साह, तीनखेड्यात ज्येष्ठ नागरिक दिन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

तीनखेडा येथील अलोपॅथीक दवाखाना व उपकेंद्रात सेवा संकल्प अभियानांतर्गत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासोबतच त्यांच्या



सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक अडचणींवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील ९९ वर्षीय ज्येष्ठ नागरिक केशवरावजी लेंडे उपस्थित होते. यावेळी ९८ वर्षीय पार्वताबाई नासरे यांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. वयोमानाच्या या टप्प्यावरही त्यांचा उत्साह व सकारात्मक दृष्टिकोन उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये मधुमेह, रक्तदाब, कर्करोगाशी संबंधित प्राथमिक लक्षणे, मोतीबिंदू तसेच वातविकार आदींची तपासणी करण्यात आली. एकूण ६६ ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध सामाजिक, कौटुंबिक आणि आर्थिक समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्याची नियमित तपासणी, आजारांची प्राथमिक लक्षणे ओळखणे, वेळेवर उपचार घेणे तसेच दैनंदिन जीवनातील आरोग्यविषयक काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. उमेश देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकांशी आत्मीयतेने संवाद साधत त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. तपासणी करून आवश्यक उपचार व समुपदेशन करण्यात आले. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामदास केंद्रे, सविता गजभिये, निलेश राऊत, शोभा चाफले आणि कुणाल नासरे यांनी सहकार्य केले.

## जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रिकेट : पोरवाल कॉलेजचा महिला संघ उपविजेता



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींनी लेदर बॉल जिल्हास्तरावरील क्रिकेट स्पर्धेत उपविजेता ठरला. निरी येथील वसंत नगर क्रिकेट मैदानात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात सावनेरच्या भालेराव कनिष्ठ महाविद्यालय' याच्या विद्याथीनींनी पोरवाल संघाला मात दिली.पोरवाल संघाने १६ धावांचे टार्गेट दिले. प्रतिस्पर्धी संघाने पहिल्याच घटकात आपले लक्ष गाठले. पोरवालच्या चमूमध्ये अंशिका सानिया शेख साक्षी सहारे, सृष्टी दांडेकर, शर्वरी बावरी, वंशिका जीवतोडे, निहारिका शंभरकर, निधी राकडे, धारणा कादियान, देवी कट्टर पवार ,आश्लेषा फुले, प्रीती सोनवणे, या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. तत्पूर्वी पोरवाल संघाने हिंगणा संघाला मात दिली. पोरवाल संघाला क्रीडा शिक्षिका प्रा. मल्लिका नागपुरे यांचे सहकार्य लाभले. उपविजेत्या टीमचे अभिनंदन कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्निल दहात उपप्राचार्य प्राध्यापक विश्वनाथ वंजारी व पर्यवेक्षक प्राध्यापक नरेंद्र मेंढे यांनी केले.

## बाजीरावजी कावडुजी मने यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बाजीरावजी कावूडुजी मने (वय ८५) यांचे गुरुवारी १ ऑक्टोबर रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी सकाळी १० वाजता. निघणार आहे. ही अंत्ययात्रा जवाहरनगर, गल्ली क्र. २, सिंधू अपार्टमेंट, प्लॉट क्र. २९७ येथील त्यांच्या राहत्या घरून निघून मानेवाडा घाटावर पोहोचेल. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न !



### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास, दुष्काळी परिस्थिती पाहून ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या तालुक्यांचाही समावेश करणार, अचूक पंचनामे करा; शेतकऱ्याची सही घ्या

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

पंचनामे लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खिशात काहीतरी मदत गेली पाहिजे, असा सरकारचा विचार असून कॅबिनेट उपसमितीचीही त्याबाबत शिफारस असल्याचे महसूल मंत्री व दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, राज्यातील दुष्काळी परिस्थितीत ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या मात्र प्रत्यक्षात दुष्काळाची स्थिती असलेल्या सुमारे १५ ते १८ तालुक्यांनाही अचूक पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळाच्या कक्षेत आणून न्याय देण्यात येईल.

ते माध्यमांशी बोलत होते. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि नंदुरबारमधूनही अशा तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागण्या आल्या असून, टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

वर हिरव दिसतं, पण खाली काही नाही, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे. त्यामुळे केवळ ट्रिगर-वनमध्ये तालुका आला आहे की नाही, एवढ्यावर न थांबता अचूक पंचनामा करणे आवश्यक आहे. अचूक पंचनामा झाला तर शेतकऱ्याला न्याय मिळेल. पंचनामा करताना शेतकऱ्याची सही घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून खरीखुरी वस्तुस्थिती समोर येईल. आणेवारी निघाल्यानंतर दुष्काळातील मदतीचा फायदा शेतकऱ्यांना मिळू शकतो.

**तीन दिवसांत सहा जिल्ह्यांत पाहणी**

अचूक पंचनामे होत आहेत की नाहीत, याची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी आपण पुढील तीन दिवसांत सहा जिल्ह्यांना भेट देणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. संभाजीनगर-जालना, त्यानंतर अकोला-बुलढाणा आणि ४ तारखेला धुळे-जळगाव येथे आपण जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंचनाम्यासाठी नेमकी टीम फिल्डवर आहे का, खरा पंचनामा होत आहे का, हे मी तपासणार आहे, असे ते म्हणाले. महसूल, कृषी आणि ग्रामविकास या तीन विभागांकडून पंचनामे केले जातात आणि पंचनाम्यावर तीन विभागांच्या स्वाक्षऱ्या असतात. त्यामुळे तीनही विभागांनी समन्वयाने आणि अचूक पंचनामे करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई**

मंत्री पाहणीसाठी येणार म्हणून बांधावर रॅम्प तयार करून शेतकऱ्यांच्या वरून उडी मारण्याच्या प्रकाराबाबत बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा पद्धतीने शेतकऱ्यांची थट्टा करणे योग्य नाही. मंत्री आले तर बांधावर रॅम्प करायचे आणि शेतकऱ्यांच्या वरून उडी मारायची, हे योग्य नाही. त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार, असे त्यांनी स्पष्ट केले. गावातील प्रशासकीय यंत्रणा गावातच असली पाहिजे, तालुक्याची यंत्रणा तालुक्यात आणि जिल्ह्याची यंत्रणा जिल्ह्यात असली पाहिजे. गावपातळीवरील यंत्रणा उपलब्ध असेल तरच दुष्काळात योग्य काम करता येईल. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सुट्ट्या रद्द केल्या आहेत, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

**दुष्काळात शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी बँकांनी जाऊ नये**

दुष्काळी परिस्थितीत बँकांनी शेतकऱ्यांच्या मागे लागून कर्जवसुली करू नये, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला. बँकांनी शेतकऱ्यांच्या मागे लागायचे नाही. तसे झाले तर सरकार कठोर कारवाई करेल, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी याबाबत मुख्य सचिवांना सूचना दिल्या असून जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व बँकांना बोलावून सूचना द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. पतसंस्थांपासून राष्ट्रीय बँकांपर्यंत, खासगी बँकांपासून डीसीसी बँकांपर्यंत कोणतीही बँक दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्ज मागण्यासाठी किंवा वसुलीसाठी जाऊ नये, असे निर्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

अवैध सावकारी आढळल्यास ती मोडून काढू, असा कठोर इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांना आत्महत्येकडे नेणाऱ्या आणि त्यांची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची सावकारांकडून किंवा बँकांकडून फसवणूक होत असल्यास त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून द्यावे. मुख्यमंत्र्यांनी ११ सदस्यीय कॅबिनेट उपसमितीला पूर्ण अधिकार दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले. २५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**सीएसआरच्या माध्यमातूनही दुष्काळ निवारणासाठी मदत घेणार**

दुष्काळाच्या परिस्थितीत टँकर, पाणीटंचाई आणि छावण्यांची व्यवस्था सरकार करणारच आहे. मात्र प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आपल्या जिल्ह्यातील मोठ्या औद्योगिक क्षेत्रांशी चर्चा करून उरफ्या माध्यमातून मदत मिळवावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांसाठी ५ ऑक्टोबरपासून बँक मेळावे

### पाच तालुक्यांमध्ये पंचायत समितीनिहाय आयोजन, आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** जिल्ह्यातील पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांसाठी 5 ते 9 ऑक्टोबरदरम्यान पंचायत समितीनिहाय बँक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांमध्ये लाभार्थ्यांना बँकिंग प्रक्रियेसह योजनेच्या लाभासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहताना लाभार्थ्यांनी आधार कार्ड, पॅन कार्ड आणि छायाचित्र सोबत आणावे. संबंधित पंचायत समितीच्या ठिकाणी आयोजित या मेळाव्यांना बँक अधिकारी तसेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

पंचायत समितीनिहाय मेळावे- ५ ऑक्टोबर - नरखेड, ६ ऑक्टोबर - मौदा, ७ ऑक्टोबर - रामटेक, ८ ऑक्टोबर - पारशिवनी आणि ९ ऑक्टोबर - सावनेर असे आहेत. पीएम विश्वकर्मा योजनेच्या संबंधित लाभार्थ्यांनी आपल्या तालुक्यातील निर्धारित दिवशी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पुढाकारातून चोरबाहुली येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

### ३७५ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

पेंच व्याघ्र प्रकल्प,चोरबाहुली आणि माधव नेत्रालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने चोरबाहुली येथे नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, चोरबाहुली येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा एकूण ३७५ नागरिकांनी लाभ घेतला. शिबिरामध्ये नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करून दृष्टीदोष, मोतीबिंदू तसेच डोळ्यांशी संबंधित विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर पुढील उपचार अथवा शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या गरजू रुग्णांची निवड करण्यात आली असून, संबंधित रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया व आवश्यक पुढील उपचार माधव नेत्रालय कडून करण्यात येणार आहेत.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना शिबिराच्या ठिकाणी सहजपणे पोहोचता यावे, यासाठी परिसरातील विविध गावांमधून नागरिकांच्या वाहतुकीसाठी पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून जीप्सी वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. या सुविधेमुळे दुर्गम भागातील अनेक नागरिकांना शिबिराचा लाभ घेणे शक्य झाले. महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य स्वानंद सोनी व उपसंचालक अक्षय गजभिये यांच्या संकल्पनेतून सदर कार्यक्रम साकारण्यात आला. पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास पेंच व्याघ्र प्रकल्प, क्षेत्र संचालक एस. रमेशकुमार, पेंच व्याघ्र प्रकल्प,उपसंचालक अक्षय गजभिये तसेच सहाय्यक वनसंरक्षक पूजा लिमगावकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी, चोरबाहुली जयेश तायडे, पवनी वनपरिक्षेत्र अधिकारी निशिकांत कापगते, क्षेत्रसहाय्यक गणेश खंडाईत, दुर्गाप्रसाद खंडाते तसेच चोरबाहुली वनपरिक्षेत्रातील वनरक्षक, वन कर्मचारी, वन्यजीव मार्गदर्शक (गाईड), जीप्सी चालक आणि स्थानिक नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला. पेंच व्याघ्र प्रकल्प आणि माधव नेत्रालय यांच्या संयुक्त पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे दुर्गम व ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसराच्या जवळच मोफत नेत्र तपासणी तसेच पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध झाली. वन विभागाच्या संवर्धनात्मक कार्यासोबतच स्थानिक समुदायाच्या आरोग्य व सामाजिक गरजांना प्रतिसाद देणारा हा उपक्रम ठरला.

# डॉ. सावन धर्मपुरीवार यांना मानाचा 'राष्ट्रीय नवोदयन पुरस्कार' प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**



स्थानिक विद्यासागर कला महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख तथा कवी आणि अनुवादक प्रा. डॉ. सावन गिरीधर धर्मपुरीवार यांना केंद्र शासनाद्वारे संचालित जवाहर नवोदय विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या 'नवसंवाद फाऊंडेशन आणि जे.एन.व्ही. इंडिया यांच्या वतीने पुणे येथील ह्यपुणे विद्यार्थी गृह कॉलेज ऑफ इंजिनियरिंग येथे संपन्न झालेल्या नॅशनल नवोदयन पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्यात, कला, मानव्यशास्त्र आणि साहित्याच्या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'नॅशनल नवोदय पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

डीआरडीओ माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा सहयोगी संचालक किशनराव सिरसकर, केंद्रीय कर विभागाचे सहाय्यक आयुक्त स्वप्नील बघल, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांच्या हस्ते हा पुरस्कार यांच्या हस्ते डॉ. सावन धर्मपुरीवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जवाहर नवोदय विद्यालय पुणेचे प्राचार्य प्रवीण खेडकर, नवसंवाद फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल पवार आणि 'नवसंवाद फाऊंडेशनच्या माजी अध्यक्षा डॉ. कविता पवार निकम यावेळी मंचावर उपस्थित होत्या.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांना दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदा भारतभरातील जवाहर नवोदय विद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांमधून विविध क्षेत्रांतील २७ पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला. प्रशासन, कृषी, वाणिज्य, विज्ञान, नेतृत्व, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, तंत्रज्ञान, कला, मानव्यशास्त्र व साहित्य आदी विविध क्षेत्रांचा त्यात समावेश होता. यात प्रशासन प्रवर्गातून राजेश नागस्वरम (जेएनव्ही कुर्नुल आंध्रप्रदेश), वर्ला पापय्या ( जेएनव्ही खम्मम, तेलंगाना), कृषी प्रवर्गातून कुमुदा एच.पी. (जेएनव्ही कोडागु कर्नाटक), वाणिज्य प्रवर्गातून अरविंद कुमार (जेएनव्ही उन्नाव उत्तरप्रदेश), नेतृत्व प्रवर्गातून ओम तिवारी (जेएनव्ही शहदोल मध्यप्रदेश) शिक्षण प्रवर्गातून हेमराज आसोले (जेएनव्ही हिंगोली महाराष्ट्र), आरोग्य प्रवर्गातून डॉ. चंद्रशेखर आझाद (जेएनव्ही अयोध्या उत्तरप्रदेश) यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

डॉ. धर्मपुरीवार हे जवाहर नवोदय विद्यालय, नागपूरचे माजी विद्यार्थी असून रामटेक येथील विद्यासागर कला महाविद्यालयात मागील २२ वर्षांपासून इंग्रजी विषयाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. इंग्रजी व मराठी विषयाचे संशोधक, साहित्यिक आणि प्रभावी सूत्रसंचालक म्हणून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

हा राष्ट्रीय सन्मान अधिक समर्पणाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा असल्याचे डॉ. धर्मपुरीवार यांनी सांगत नवसंवाद फाऊंडेशनच्या निवड समितीचे आभार मानले. या यशाचे श्रेय त्यांनी जवाहर नवोदय विद्यालय नागपूर येथील गुरुजण, आई वडील आणि सहकारी मित्रांना दिले. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# एलसीबीचा धडाका : गोवंशाने भरलेला आयशर ट्रक पकडला, २०.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**



पहाटेच्या अंधाराचा फायदा घेत अवैधरीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या आयशर ट्रकवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक कारवाई केली. सावरकर चौकातील पोलीस मुख्यालयासमोर ट्रक अडवून केलेल्या तपासणीत तब्बल २६ गोवंश आढळून आले. या कारवाईत ट्रक, गोवंश आणि मोबाईल असा एकूण २० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चालकाला ताब्यात घेण्यात आले असून, या प्रकरणातील अन्य एका संशयिताचा शोध सुरू आहे.

१ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.४० ते सकाळी ७.४० वाजताच्या सुमारास एलसीबी पथकाने सावरकर चौक, पोलीस मुख्यालयासमोर संशयास्पद आयशर ट्रक क्रमांक एमएच ३४ टी ३२११ अडविला.

वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये २४ गाई आणि दोन बैल असे २६ गोवंश आढळून आले. त्यांची अंदाजे वयोमर्यादा ८ ते १२ वर्षे असून, त्यांची किंमत सुमारे ५ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या कारवाईत १५ लाख रुपये किमतीचा आयशर ट्रक आणि २० हजार रुपये किमतीचा जुना विवो २३ मोबाईल असा मुद्देमालही जप्त करण्यात आला. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत २० लाख ४० हजार रुपये आहे. या प्रकरणी प्रशांत बालाजी जुमनाके (३०), व्यवसाय चालक, रा. वॉर्ड क्रमांक ४, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर याला अटक करण्यात आली आहे. तर मुन्ना शेख रा. गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर हा पाहिजे आरोपी असून त्याचा शोध घेतला जात आहे.

गोवंशाची अवैध वाहतूक करताना त्यांना क्रूरतेने वागणूक दिल्याप्रकरणी प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ सुधारित २०१५ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या चंद्रपूर उपविभागाच्या पथकाने केले.

# महात्मा गांधी : आधुनिक जगाचे शाश्वत मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

महात्मा गांधी हे केवळ भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेते नव्हते, तर बदलत्या आणि आधुनिक जगाला शांतता, पर्यावरण संवर्धन आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारे एक शाश्वत मार्गदर्शक आहेत. आजचे आधुनिक जग हे तंत्रज्ञान, युद्ध आणि पर्यावरणाच्या गंभीर समस्यांनी वेढलेले आहे. अशा वेळी गांधीजींचे विचार आणि त्यांची जीवनशैली अधिक प्रासंगिक ठरते.

आजच्या अतिशय गतिमान, संपूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आणि बऱ्याच अंशी चंगळवादी बनलेल्या एकविसाव्या शतकात आपण भौतिक प्रगतीचे सर्वोच्च शिखर गाठले आहे. विज्ञानाने माणसाला अंतराळात पोहोचवले आणि तंत्रज्ञानाने संपूर्ण जग एका छोट्या पडद्यावर आणून ठेवले. परंतु, या भौतिक विकासाच्या झगमगाटात माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य, तसेच निसगार्चा समतोल पूर्णपणे ढासळला आहे. अशा या गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक काळात महात्मा गांधींचे विचार केवळ इतिहासाच्या पानांपुरते किंवा जयंती-पुण्यतिथीच्या भाषणांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते सध्याच्या अनेक जागतिक, आर्थिक आणि सामाजिक समस्यांवरील अत्यंत प्रभावी, व्यवहार्य आणि शाश्वत उपाय बनले आहेत. गांधीजींचे विचार हे निसर्गाशी आणि माणसांशी नाळ जोडणारे एक असे सखोल जीवनसूत्र आहे, जे कोणत्याही काळात कालबाह्य होऊ शकत नाही. आजच्या जगात जर मानवी अस्तित्वाला टिकून राहायचे असेल, तर गांधीजींची 'खेड्याकडे चला', 'स्वदेशी', 'अहिंसा' आणि 'स्वच्छता' ही मूल्ये नव्या संदर्भात आणि आधुनिक रूपात स्वीकारणे ही काळाची सर्वांत मोठी आणि अपरिहार्य गरज बनली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजींनी देशाला 'खेड्याकडे चला' हा अत्यंत दूरदृष्टीचा मंत्र दिला होता, कारण भारताचा खरा आत्मा आणि भविष्य खेड्यांतच वसतो हे त्यांनी अचूक ओळखले होते. गेल्या काही दशकांत आपण तथाकथित विकासाच्या शोधात शहरांकडे एवढी बेसुमार धाव घेतली की, आजची शहरे वाढत्या गर्दीने, जीवघेण्या प्रदूषणाने, गुन्हेगारीने आणि वाहतूक कोंडीने पूर्णपणे गुदमरून गेली आहेत. सिमेंटच्या जंगलात माणसाचा श्वास कोंडत आहे. दुसरीकडे, रोजगाराच्या आणि दर्जेदार शिक्षणाच्या शोधात तरुणांचे लोंढे शहरांकडे गेल्यामुळे आपली गावे भकास आणि ओस पडत आहेत. शेती हा व्यवसाय संकटात आल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस आली आहे.

या भीषण समस्येवर 'आधुनिक ग्रामस्वराज्य' हाच एकमेव शाश्वत विकासाचा मार्ग उरतो. आजच्या काळात खेड्याकडे चला याचा अर्थ जुन्या, गैरसोयीच्या जीवनशैलीकडे परत जाणे असा अजिबात नसून, गावांना आधुनिकीकरणाशी जोडत सर्वार्थाने स्वयंपूर्ण बनवणे हा आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व क्रांतीमुळे आज जगाच्या पाठीवर कोठूनही काम करणे शक्य झाले आहे. गावात जर चोवीस तास अखंड वीज, वेगवान इंटरनेट आणि आवश्यक सोयीसुविधा पोहोचल्या, तर तरुण शहरांच्या गर्दीत न जाता गावातूनच आपले दूरस्थ कामकाज अत्यंत प्रभावीपणे करू शकतात. याशिवाय गावातच शेतीला पूरक असणारे अन्नप्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग, डेअरी आणि पारंपरिक हस्तकला यांसारख्या कृषी-उद्योगांचे भक्कम जाळे विणल्यास रोजगाराच्या अमर्याद संधी तिथेच निर्माण होतील. उत्तम रुग्णालये, अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त शाळा आणि पक्के रस्ते जर गावातच पोहोचले, तर शहरांकडे होणारे स्थलांतर १०० टक्के थांबेल. गावाचा मूळ नैसर्गिक आत्मा आणि शहराच्या आधुनिक सुविधा असा सुवर्णमध्य साधला, तरच देशाचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण आणि समतोल विकास साधता येईल.

गावांच्या सक्षमीकरणासोबतच 'स्वदेशी' या विचाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी आजच्या जागतिकीकरणाच्या आणि खुल्या बाजारपेठेच्या युगात अधिक महत्त्वाची ठरते. आज स्वदेशी म्हणजे केवळ परदेशी वस्तूंवर आंधळेपणाने बहिष्कार टाकणे नसून, आपल्या स्थानिक उत्पादनांना, उद्योजकांना आणि श्रमिकांना जाणीवपूर्वक प्रोत्साहन देणे हा त्याचा खरा गाभा आहे. सध्याचे 'स्थानिक उत्पादनांना प्राधान्य' देण्याचे धोरण हे स्वदेशीचेच एक अत्यंत प्रगल्भ आणि आधुनिक रूप आहे. जेव्हा आपण एखाद्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीची किंवा परदेशी बनावटीची वस्तू घेण्याऐवजी आपल्या आजूबाजूला तयार होणारी वस्तू खरेदी करतो, तेव्हा आपण केवळ एक आर्थिक व्यवहार करत नसतो, तर स्थानिक शेतकरी, छोटे व्यावसायिक, महिला बचत गट आणि पारंपरिक कारागिरांच्या कुटुंबाला हक्काचा रोजगार मिळवून देत असतो. यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण न होता पैसा स्थानिक पातळीवरच फिरत राहतो आणि तळागाळातील आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होते. या आधुनिक स्वदेशीचा आणखी एक सर्वांत मोठा आणि जागतिक पातळीवरील फायदा म्हणजे पर्यावरण रक्षण.

परदेशातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून आपल्यापर्यंत येणाऱ्या वस्तूंसाठी प्रचंड प्रमाणात जीवाश्म इंधन जाळले जाते आणि निसर्गाची हानी होते. याउलट, स्थानिक पातळीवर पिकवलेल्या आणि तयार केलेल्या वस्तू वापरल्यास वाहतुकीचा पल्ला कमी होऊन कर्ब उत्सर्जन म्हणजेच कार्बन फूटप्रिंट मोठ्या प्रमाणावर घटते, ज्यामुळे सध्याच्या अत्यंत गंभीर बनलेल्या जागतिक तापमानवाढीला आळा घालण्यास थेट मदत होते. आपली अर्थव्यवस्था स्वावलंबी बनवणे आणि सोबतच निसर्गाचे रक्षण करणे हे दुहेरी उद्दिष्ट स्वदेशीच्या माध्यमातून साध्य होते.

आर्थिक आणि पर्यावरणीय विकासाला जर शांततेची जोड नसेल, तर तो विकास विनाशाकडे नेतो. म्हणूनच समाजाला आज शांततेची नितांत गरज आहे, जिथे गांधीजींचा 'अहिंसा आणि सहिष्णुता' हा विचार दीपस्तंभासारखा मार्गदर्शन करतो. आज जगात विविध देशांमध्ये भीषण युद्धे सुरू आहेत आणि दहशतवादाचे काळे सावट सर्वत्र पसरले आहे. शस्त्रांच्या स्पर्धेने जगाला विनाशाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. पण या पारंपरिक हिंसेहूनही अधिक वेगाने पसरणारी आणि भयंकर अशी मानसिक व शाब्दिक हिंसा आज समाजमाध्यमांवर पाहायला मिळते. वैचारिक मतभेद असलेल्या व्यक्तीला अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन ट्रोल करणे, शिवीगाळ करणे, खोटे वृत्त पसरवून बदनामी करणे आणि समाजात जाती-धर्माच्या नावावर जाणीवपूर्वक द्वेष पसरवणे, ही आजची सर्वांत मोठी आणि घातक हिंसा बनली आहे. शस्त्राने केलेली जखम



भरून येते, पण शब्दांनी आणि द्वेषाने केलेली मानसिक हिंसा समाजमनाला आतून पोखरून काढते. अशा गढूळ आणि असुरक्षित वातावरणात दुसऱ्याच्या वेगळ्या मतांचा, धर्माचा आणि जीवनशैलीचा मोकळ्या मनाने आदर करायला शिकणे, म्हणजेच 'सहिष्णुता' बाळगणे ही आजच्या काळातील सर्वांत मोठी अहिंसा आहे. लोकशाहीत मतभेद असणे अत्यंत स्वाभाविक किंबहुना आवश्यक आहे, पण त्या मतभेदांचे रूपांतर मनभेदात आणि वैयक्तिक शत्रूत्वात होऊ न देणे हे प्रगल्भतेचे लक्षण आहे. समाजमाध्यमांवर टायपिंग करताना स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवणे, कोणाचाही द्वेष न करणे आणि विचारांची लढाई केवळ विचारांनीच लढणे, हाच आजच्या दैनंदिन जीवनातील अहिंसेचा खरा आणि आवश्यक सराव आहे.

सरतेशेवटी, मानवी जीवन आणि निसर्ग यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा धागा म्हणजे 'स्वच्छता'. गांधीजींनी स्वच्छतेला ईश्वरी सेवेइतकेच सर्वोच्च आणि पवित्र मानले होते. स्वातंत्र्यापेक्षाही स्वच्छता महत्त्वाची आहे, हा त्यांचा विचार आज अधिक प्रकर्षाने जाणवतो. आजच्या भरमसाट औद्योगिकीकरणाच्या युगात स्वच्छता ही केवळ रस्ते, अंगण किंवा घरापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर मानवाच्या आणि सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी तिचे स्वरूप अत्यंत व्यापक आणि गंभीर झाले आहे. आज मानवाने निर्माण केलेला कचरा अत्यंत घातक स्वरूपाचा असून त्यात शेकडो वर्षे नष्ट न होणारे प्लास्टिक, घातक रसायने आणि ई-कचऱ्याचा मोठा समावेश आहे. आपल्या नद्या, तलाव आणि महासागर या कचऱ्यामुळे आणि सांडपाण्यामुळे अत्यंत प्रदूषित झाले आहेत. सूक्ष्म प्लास्टिक आता माणसाच्या अन्नातून शरीरात भिनू लागले आहे. हवेची गुणवत्ता इतकी खालावली आहे की अनेक मोठ्या शहरांमध्ये शुद्ध श्वास घेणेही कठीण झाले आहे. अशा वेळी, प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा जाणीवपूर्वक स्वीकार करणे, अधिकाधिक झाडे लावून ती जगवणे, नद्यांचे पावित्र्य राखणे आणि संपूर्ण पर्यावरणाची स्वच्छता राखणे ही आजच्या काळात जिवंत राहण्यासाठीची सर्वांत मोठी पूर्वअट बनली आहे. माणसाने स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्गाचे केलेले बेसुमार शोषण थांबवून, निसगार्चा समतोल राखण्याची वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारायलाच हवी. विचारांची स्वच्छता आणि परिसराची स्वच्छता या दोन्ही गोष्टी जेव्हा एकत्र येतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने निरोगी समाज निर्माण होईल.

महात्मा गांधींचे विचार हे केवळ ग्रंथांमध्ये वाचून विसरून जाण्यासाठी नाहीत, तर ते प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी आणि जगण्यासाठी आहेत. ग्रामस्वराज्य, स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ देणारी स्वदेशी, मन आणि समाज जोडणारी अहिंसा, तसेच पर्यावरणाचे रक्षण करणारी स्वच्छता या प्रमुख मूल्यांचा अंतःकरणापासून स्वीकार केल्याशिवाय मानवाचे भविष्य सुरक्षित नाही. हे शाश्वत विचार अंगीकारून आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम, मानसिकदृष्ट्या शांत, प्रगल्भ आणि पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित असा नवा भारत घडवू शकतो. आणि हीच खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकात महात्मा गांधींना वाहिलेली सर्वांत मोठी आणि सार्थ आदरांजली ठरेल.

थोडक्यात सांगायचे तर, महात्मा गांधींचे विचार केवळ भूतकाळापुरते मर्यादित नसून, ते आधुनिक जगाच्या भविष्याची गुरुकिल्ली आहेत. भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या जगाला मानवी मूल्ये, शांतता आणि निसर्गाचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'गांधीवाद' हाच एकमेव शाश्वत आणि कायमस्वरूपी मार्ग आहे.

– ९५६१५९४३०६

# अहिंसा परमं तपः

श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी
गडचिरोली

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन दरवर्षी २ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, जो थोर तत्ववेत्ते महापुरुष महात्मा मोहनदास गांधीजी आणि लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीचा दिवस आहे. गांधीजींनी अहिंसेचा मार्ग दाखवून जगाला शांतता आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. या दिवसाचा उद्देश जगभरातील लोकांना अहिंसा आणि शांततेच्या तत्त्वांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे आहे.



अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसाचार न टाळता विचार, शब्द आणि कृतींमध्येही शांतता राखणे. या तत्त्वावर आधारित समाज अधिक समजूतदार, सहकार्यशील आणि शांततापूर्ण बनू शकतो. संघर्ष, युद्ध आणि तणावमुक्त जग निर्माण करण्यासाठी अहिंसेची शिकवण अत्यंत आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाच्या निमित्ताने, जगभरात अहिंसेच्या संदेशाचा प्रचार केला जातो आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय असमानता सोडवण्यासाठी संवाद, सहकार्य आणि सहानुभूती यांचा अवलंब करण्यास प्रवृत्त केले जाते. या दिवशी लोकांना गांधीजींच्या शिकवणीचे महत्त्व पटवून दिले जाते आणि त्यांच्या तत्त्वांच्या अनुसरणावर भर दिला जातो.

अहिंसा म्हणजे काया, वाचा व मनाने कोणत्याही सजीवाला इजा, दुखापत किंवा पीडा न पोहोचविणे ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाची नैतिक संकल्पना आहे. अहिंसेचे स्वरूप व व्यापकताः १) अर्थ- हिंसा न करणे म्हणजे अहिंसा. ही केवळ शारीरिक हिंसा टाळण्यापुरती मर्यादित नाही. २) तीन स्तरः विचार -मन, वाणी- वाचा आणि कृती- कर्म या तिन्हींमधून इतरांना हानी न पोहोचविणे. ३) व्यापक दृष्टीकोनः सर्व प्राणिमात्रांप्रती करुणा आणि प्रेम ठेवणे हा अहिंसेचा मूळ उद्देश आहे. धार्मिक महत्त्वः जैन धर्म- जैन धर्मामध्ये अहिंसेला सर्वोच्च धार्मिक आणि नैतिक आदर्श- महाव्रत मानले गेले आहे. बौद्ध धम्मः बौद्ध धम्मात पंचशीलात अहिंसेला पहिले स्थान दिले असून सर्व प्राण्यांवर दया दाखवण्यास सांगितले आहे. हिंदू धर्म- हिंदू धर्मातील विविध ग्रंथांमध्ये व दर्शनांमध्ये अहिंसेला धर्म पालनाचे मुख्य अंग मानले आहे.

महात्मा गांधींजींचे कार्य- सत्याग्रहः महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात सत्याग्रह व अहिंसा या तत्त्वांचा प्रभावी वापर केला. जागतिक अहिंसा दिनः गांधीजींच्या व शास्त्रीजींच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून पाळला जातो. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाची नैतिक संकल्पना आहे. काया, वाचा व मन यांनी कोणत्याही सजीवाला इजा, दुखापत किंवा पीडा न पोहोचविणे याला अहिंसा असे म्हणतात. हिंदू धर्म, जैन धर्म आणि बौद्ध धम्म यांमध्ये अहिंसेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अहिंसा ही केवळ शारीरिक हिंसा टाळण्यापुरती मर्यादित नसून विचार, वाणी आणि कृती यांमधून इतरांना हानी न पोहोचविण्याचा व्यापक जीवनदृष्टिकोन मानला जातो. जैन धर्मात अहिंसा हा सर्वोच्च धार्मिक आणि नैतिक आदर्श मानला जातो. बौद्ध धम्मात सर्व प्राणिमात्रांप्रती करुणा आणि अहिंसक वर्तन यांवर भर दिला जातो, तर हिंदू धमार्तील अनेक ग्रंथांमध्येही अहिंसेचे महत्त्व प्रतिपादित केले आहे.

महात्मा मोहनदास गांधीजी यांनी अहिंसेच्या तत्त्वाचा सामाजिक व राजकीय संघर्षामध्ये प्रभावीपणे उपयोग केला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सत्याग्रह आणि अहिंसक प्रतिकार या माध्यमांतून त्यांनी या तत्त्वाचा प्रसार केला. या संदर्भात स्मितहास्य महत्त्वाचं ठरतं. लोकांना स्मित करायला आवडतं, संतापायला किंवा गंभीर चेहऱ्याने बसायला आवडत नाही. मुलांना, आणि अगदी कुत्र्यांनाही स्मितहास्य करायला आवडतं. तुम्ही कुत्र्याकडे पाहून स्मित करता, तेव्हा तो तुमच्याकडे पाहून शेपूट हलवतो. तुम्ही कुत्र्याला खाणं दिलंत आणि तुमचा चेहरा अतिशय गंभीर असेल, तर कुत्रा खाणं घेतो, पण निघून जातो.

– ९६९९८३६७१७

# दारूच्या विळख्यात बरबाद आयुष्य आणि उध्वस्त कुटुंबे

## जागतिक मद्यपान विरोधी दिन विशेष

डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

दारुड्या व्यक्तीचे नाव येताच आपल्या मनात सर्वप्रथम जी प्रतिमा उभी राहते, ती म्हणजे दुर्गुणांनी भरलेल्या, अस्वच्छ आणि नशेच्या अवस्थेत स्वतःवरील नियंत्रण गमावलेल्या व्यक्तीची. ज्याला कोणीही सन्मान देऊ इच्छित नाही. प्रत्येकजण दारुड्या व्यक्तीपासून दूर राहू इच्छितो. कुटुंबातील सदस्यही आपल्या कुटुंबातील दारूच्या आहारी गेलेल्या व्यक्तीकडे तिरस्काराने पाहतात. स्वतः दारूचे व्यसन असलेली व्यक्तीही आपल्या मुलाला दारूच्या आहारी गेलेले पाहणे कधीच पसंत करत नाही. दारूच्या नशेत आज वडील मुलाचा जीव घेतात, तर मुलगा आई-वडिलांचा जीव घेतो, अशा बातम्या आपण अनेकदा वाचतो. दारू ही इतकी घातक गोष्ट आहे. अल्कोहोल हा एक मनोविकारक आणि विषारी पदार्थ असून त्याचे व्यसन लागू शकते. हे विष हळूहळू मेंदूला कमजोर करते आणि नंतर दारूच्या आहारी गेलेली व्यक्ती आपल्या मेंदूवरील नियंत्रण गमावते. त्यानंतर मनुष्य स्वतःच्या नियंत्रणात राहत नाही आणि अनुचित कृत्येही करू लागतो, कारण नशेमुळे चांगले आणि वाईट यातील फरक करण्याची त्याची क्षमता नष्ट झालेली असते.

आजच्या आधुनिक युगात व्यसन जणू काही फॅशनच झाले आहे, असे जाणवते. लोकांमध्ये नशेबद्दल वाढत असलेल्या आकर्षणामुळे आकडेवारी दर्शवते की, भारतातील दारूची बाजारपेठ २०३० च्या दशकापर्यंत दुप्पट होण्याच्या मार्गावर आहे. किशोरवयीन विद्यार्थी-विद्यार्थिनीही पार्टीच्या नावाखाली दारू पितात. रस्त्यावर नशेत धुंद होऊन धिंगाणा घालताना त्यांना आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहत असतो. नवीन वर्ष, होळी किंवा वाढदिवसाच्या पार्टीच्या नावाखाली होणाऱ्या तरुणांच्या नशेच्या पार्ट्यांचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होतात. ना कपड्यांचे भान असते, ना संस्कारांचे; केवळ मदहोशीची मस्ती छायलेली असते. कमी वयाची मुलेही दारूच्या आहारी जात आहेत, ज्यामुळे समाजात बालगुन्हेगारीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

देशात गुन्हेगारीचा आलेख झपाट्याने वाढत आहे. सध्या गुन्ह्यांमध्ये कमी वयाचे तरुण अधिक प्रमाणात दिसून येतात. बलात्कार, खून, दरोडे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्येही अल्पवयीनांची संख्या मोठी आहे. नशेमुळे गुन्हेगारी वाढते. बहुतांश गुन्हे नशेसाठी किंवा नशेच्या अवस्थेत केले जातात. बहुतांश गुन्हेगार कोणत्या ना कोणत्या प्रकारचे व्यसन करतात. आपल्या समाजात दारू सहज उपलब्ध होणारे व्यसन आहे, ज्यापर्यंत कोणाचीही सहज पोहोच होऊ शकते. मागास भाग, कमी शिक्षित वर्ग आणि ग्रामीण क्षेत्रांमध्ये देशी दारू तयार करणाऱ्या बेकायदेशीर भट्ट्यांच्या बातम्याही मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. बनावट विषारी दारूचा बाजारही सातत्याने वाढत आहे. बनावट विषारी दारू प्यायल्यामुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. दारूच्या अवैध तस्करीचे जाळेही वेगाने विस्तारत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जगभरात २०१९ मध्ये दारूच्या सेवनामुळे सुमारे २६ लाख लोकांचा मृत्यू झाला. अंदाजानुसार, ४० कोटी लोक दारूशी संबंधित समस्यांशी झुंजत होते. त्यापैकी २०.९ कोटी लोक दारूवर अवलंबून होते. दारूमुळे झालेल्या हृदयविकारांमुळे अंदाजे ४,७४,००० लोकांचा मृत्यू झाला. मद्यपान केल्याने स्तनाचा, यकृताचा, डोके आणि मानेचा, अन्ननलिकेचा आणि मोठ्या आतड्याचा कर्करोग यांसह अनेक प्रकारच्या कर्करोगांचा धोका वाढतो. सन २०१९ मध्ये जगभरात आढळलेल्या कर्करोगाच्या एकूण प्रकरणांपैकी ४.४ टक्के प्रकरणे आणि कर्करोगामुळे झालेल्या ४,०१,००० मृत्यूंमागे दारूचे सेवन कारणीभूत होते. दारूशी संबंधित आजारांचा मोठा वाटा रस्ते अपघातांशीही संबंधित आहे. दारू पिऊन वाहन चालवल्यास अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. यात मृत्यू होतातच, परंतु अपघातांमध्ये अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्वालाही सामोरे जावे लागते. सन २०१९ मध्ये दारूशी संबंधित रस्ते अपघातांमध्ये एकूण २,९८,००० मृत्यू झाले. त्यापैकी १,५६,००० मृत्यू इतर व्यक्तींनी दारू प्यायल्यामुळे झालेल्या अपघातांमध्ये झाले. केवळ अमेरिकेतच दरवर्षी दारूशी संबंधित कारणांमुळे सुमारे ८८,००० लोकांचा मृत्यू होतो, जे टाळता येऊ शकते.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत २०१८ च्या संशोधन अहवालात सांगण्यात आले होते की, देशात सुमारे १६ कोटी व्यक्ती दारूचे सेवन करतात. त्यापैकी ५.७ कोटींपेक्षा अधिक व्यक्ती हानिकारक किंवा दारूवरील अवलंबित्वामुळे प्रभावित आहेत आणि त्यांना दारूच्या सेवनाशी संबंधित समस्यांसाठी तातडीने मदतीची गरज आहे. सन २०१६ मध्ये संपूर्ण भारतात दारूच्या सेवनामुळे झालेल्या यकृताच्या सिरोसिसमुळे सुमारे १,४०,६०० लोकांचा मृत्यू झाला. दारूचे सेवन करणाऱ्या जवळपास सर्वच लोकांना फॅटी लिव्हरची समस्या उद्भवते, जी दारू सोडल्यास बरी होऊ शकते.

भारतात दारूवर अधिक कर, उत्पादन शुल्क, परवाना शुल्क आणि इतर कर आकारले जातात. त्यातून देशभरातील राज्य सरकारांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. दारूशी संबंधित करांमधून मिळणारा एकूण वार्षिक महसूल २०२५-२६ मध्ये २ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिले. मात्र, दारूमुळे देशाचे होणारे नुकसान यापेक्षा कितीतरी पटीने मोठे आहे. संशोधनानुसार, भारतात दारूच्या सेवनामुळे होणाऱ्या मृत्यूंमुळे २०११ ते २०५० दरम्यान किमान २५.८ कोटी जीवन-वर्षांचे नुकसान होईल. दारूच्या विक्रीतून मिळणारा कर वजा केल्यानंतरही, दारूशी संबंधित आरोग्य समस्यांमुळे २०५० पर्यंत भारतीय समाजावर ९७,८९५ अब्ज रुपयांचा एकूण आर्थिक भार पडेल, जो जीडीपीच्या सरासरी १.४५ टक्के नुकसानाइतका आहे. अभ्यासात असे आढळून आले की, दारूशी संबंधित आजारांच्या उपचारांचा आरोग्य व्यवस्थेवर अंदाजे ३,१२७ अब्ज रुपयांचा आर्थिक भार पडेल. दारूमुळे होणारा सामाजिक भार, यामध्ये आरोग्य व्यवस्थेवरील खर्च, स्वतःच्या खिशातून केलेला खर्च आणि उत्पादकतेचे होणारे नुकसान यांचा समावेश असून, तो १,२१,३६४ अब्ज रुपये इतका असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

कुटुंबप्रमुखावर घराची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, पालनपोषण, आई-वडिलांची सेवा आणि त्यांच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी असते. मात्र, तोच कुटुंबप्रमुख दारूच्या नशेत बुडू लागला, तर तो स्वतःबरोबरच कुटुंब, समाज आणि देशासाठीही त्रासाचे कारण बनतो. एकदा एखाद्या व्यक्तीला व्यसनाची लागण झाली की, व्यसनाधीन व्यक्ती आपले व्यसन पूर्ण करण्यासाठी योग्य-अयोग्य अशा सर्व प्रकारची कामे करू लागते. शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते. कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर वाईट परिणाम होतो. समाजातील समस्या वेगाने वाढतात आणि विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी सर्वांनी व्यसनाला 'नाही' म्हणायला हवे आणि आपले मानसिक व शारीरिक आरोग्य मजबूत करायला हवे. जर देश व्यसनमुक्त झाला, तर गुन्हेगारी जगताचा आधारस्तंभच नष्ट होईल, कारण नशा आणि गुन्हेगारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजार, गुन्हे, अपघात आणि वादविवाद मोठ्या प्रमाणात कमी होतील. लोकांमधील भीतीचे वातावरण दूर होईल, समाजात समरसता निर्माण होईल आणि संस्कारशील समाजाची निर्मिती होईल. जीवनातील आनंद वाढेल आणि देशाच्या विकासाला गती मिळेल. जीवन अनमोल आहे. 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत व्यसनमुक्तीसाठी १४४४६ या क्रमांकावर संपर्क करा. नशा सोडा, सुखी जीवनाशी नाते जोडा.

– (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)
०८२३७४१७०४१

# बिल काढून देण्याच्या नावाने लाचेची मागणी, वेकोलिच्या वरिष्ठ पर्यवेक्षकावर सीबीआयची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
वेकोलिमध्ये कामाचे बिल मंजूर करून देण्याच्या नावाखाली कंत्राटदाराकडून पैशांची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, उमरेडच्या गांगापूर चौकात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) केलेल्या कारवाईत वेकोलिचा वरिष्ठ पर्यवेक्षक पवन नखाते रंगेहात अडकल्याचे समोर आले आहे. या कारवाईमुळे वेकोलिमधील कामांच्या बिलांच्या मंजुरीच्या प्रक्रियेवर आणि त्यातील कथित गैरप्रकारांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वेकोलिच्या कामाचे बिल मंजूर करून त्याचे भरणा करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराकडे पैशांची मागणी करण्यात आली होती. बिलाच्या रकमेतील काही हिस्सा देण्याची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. तक्रार प्राप्त झाल्यानंतर सीबीआयने स्वतंत्र पडताळणी केली आणि त्यानंतर सापळा रचून कारवाई केली. या प्रकरणात २५ लाख रुपयांच्या बिलाच्या मोबदल्यात लाचेची मागणी झाल्याचा आरोप आहे. तक्रारीच्या पडताळणीनंतर सीबीआयच्या पथकाने उमरेड



येथील गांगापूर चौक परिसरात कारवाई केली. संबंधित अधिकाऱ्याला ताब्यात घेण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सीबीआयकडून सुरू आहे.

**वेकोलिच्या बिल प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह**

एखाद्या कंत्राटदाराचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे बिल मंजूर करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडून अधिकृत प्रक्रिया राबविली जाते. मात्र, याच प्रक्रियेत पैशांची मागणी होत असल्याचे आरोप समोर येत असतील, तर संपूर्ण यंत्रणेची पारदर्शकता तपासण्याची गरज निर्माण होते. एका अधिकाऱ्यावर झालेली कारवाई ही केवळ स्वतंत्र घटना न मानता, वेकोलिमधील बिल मंजुरी, मोजमाप, तपासणी आणि देयक अदा करण्याच्या प्रक्रियेचेही परीक्षण करण्याची आवश्यकता आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकरण गांभीर्याने घ्यावे**

या घटनेच्या पार्श्वभूमीवर वेकोलिच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अंतर्गत चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यकाळात मंजूर झालेली बिले, कंत्राटदारांकडून करण्यात आलेल्या तक्रारी, कामांची मोजमाप पुस्तके, देयक प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्याच्या भूमिकेची सखोल तपासणी झाल्यास या प्रकरणाची व्याप्ती स्पष्ट होऊ शकते.
सीबीआयच्या कारवाईने एका अधिकाऱ्यावर कारवाई झाली असली, तरी प्रश्न एवढ्यावरच थांबत नाही. वेकोलिमधील कंत्राटी कामांच्या बिलांमध्ये बिल काढून देण्यासाठी पैशांची मागणी करण्याची पद्धत कुठपर्यंत आहे, याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. त्यामुळे वेकोलिच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.

## थोडक्यात

### मनपाच्या श्रमदानातून स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
केंद्र शासनाच्या स्वच्छता ही सेवा २०२६ या अभियानाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्यावतीने शहरातील सर्व १० झोनमध्ये एक दिवस, एक तास, एक साथ स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत संबंधित परिसरात सामूहिक स्वच्छता मोहीम राबवून परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छ आणि सुंदर नागपूरच्या निर्मितीसाठी स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले. शहरातील १० झोनमधील १० ठिकाणी ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.
यात लक्ष्मीनगर झोनमध्ये आयटी पार्क रोड, धरमपेठ झोनमध्ये अंबाझरी उद्यान रोड, हनुमानगर झोनमध्ये बुधवार बाजार परिसर, धंतोली झोनमध्ये कौशल्या नगर रोड, नेहरूनगर झोनमध्ये भांडेवाडी रोड व स्वामी नारायण मंदिर रोड, गांधीबाग झोनमध्ये चिंतेश्वर मंदिराच्या मागील बाजूला असलेला उमिया शंकर शाळा परिसर, सतरंजीपुरा झोनमध्ये मालधक्का रोड, लकडगंज झोनमध्ये सरदार भोला सिंग मैदान, आशीनगर झोनमध्ये कपिल नगर डब्ल्यूसीएल रोड, व मंगळवारी झोनमध्ये मंगळवारी झोन कार्यालय ते मंगळवारी बाजार परिसर नागरिकांच्या श्रमदानातून स्वच्छ करण्यात आला. नागरिकांचा सहभाग, स्वच्छतेची जबाबदारी आणि सामूहिक श्रमदानातून स्वच्छ नागपूरच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. या अभियानामुळे शहरातील विविध भागाची स्वच्छता करण्यात आली.

### हिवरा हिवरी येथे 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत श्रमदान

**'एक दिवस, एक तास' विशेष स्वच्छता उपक्रम, गावात नवचैतन्य**



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
तालुक्यातील ग्रामपंचायत हिवरा हिवरी येथे 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत 'एक दिवस, एक तास' या संकल्पनेतून विशेष स्वच्छता व श्रमदान उपक्रम गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर रोजी उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात ग्रामस्थ, महिला, शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत गावाच्या स्वच्छतेसाठी श्रमदान केले. या स्वच्छता अभियानात सरपंच सुनील गजभिये, उपसरपंच राकेश कुंभलकर, संतोष कुंभलकर, सुदाम काठोके, नंदा नेवारे, राधिका जांभुळे, ग्रामसेवक वीरेंद्र ठवरे, मुख्याध्यापक सचिन चव्हाण, करण बिरणवार, नंदू चव्हाण, स्वप्निल शिवणकर, मंगला गायधने तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि बहुसंख्य महिला ग्रामस्थ उपस्थित होते.
गावातील सार्वजनिक परिसर, रस्ते व परिसराची स्वच्छता करून नागरिकांनी स्वच्छतेचा संदेश दिला. लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गावात नवचैतन्य निर्माण झाले असून स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. विशेष म्हणजे, स्वच्छता अभियानाला अधिक प्रभावी करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने सुमारे एक महिन्यापूर्वी प्रत्येक कुटुंबाला चार कचरापेट्यांचे मोफत वाटप करण्यात आले होते. घरगुती कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व व्यवस्थापन करण्यासाठी या उपक्रमाचा मोठा उपयोग होत आहे. ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण स्वच्छता उपक्रमाला ग्रामस्थांचा मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद उल्लेखनीय असून पंचक्रोशीत हिवरा हिवरी ग्रामपंचायतीच्या स्वच्छता अभियानाचे कौतुक होत आहे. लोकसहभागातून स्वच्छ, सुंदर व निरोगी गाव निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### तिडके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नेचर ट्रेलद्वारे जंगलभ्रमंती



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
वन्यजीव सप्ताहांतर्गत श्री नरेंद्र तिडके महाविद्यालयाचा नेचर क्लब आणि राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ व वरिष्ठ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विशेष 'नेचर ट्रेल'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात वनविभागाने सक्रिय सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांना वनसंपदा, जैवविविधता, वन्यजीव आणि निसर्ग संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमात नेचर क्लबचे २० विद्यार्थी आणि एनएसएसचे ३० स्वयंसेवक सहभागी झाले. रामटेक येथील ऐतिहासिक गड मंदिराच्या पायथ्यापासून नागार्जुन मंदिरापर्यंत घनदाट जंगलातून सुमारे ५ किलोमीटरची जंगलभ्रमंती विद्यार्थ्यांनी उत्साहाने पूर्ण केली.
या जंगलभ्रमंतीदरम्यान वनपाल निलेश चव्हाण, बी. व्ही. लोणारे तसेच वनरक्षक डी. आर. डोंगरे, उमेश सोडगीर, अश्वजीत बलगेवार, राहुल पिंपळवार, कु. मिनाक्षी घोरपडे, ज्योती राऊत आणि रेखा चोंदे यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग व वन्यजीवांबाबत महत्त्वपूर्ण माहिती देत मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे, नेचर क्लबचे समन्वयक स्वप्निल मनघे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. संतोष जाधव, प्रा. किशोर धांडे, डॉ. विवेक साहू तसेच शिक्षकेतर कर्मचारी शारदा तायवाडे आणि उर्मिलाताई उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

# नळाला पाणी की आजारांचे आमंत्रण?

## मंगळवारी पेठेतील नागरिकांना आठ दिवसांपासून गढूळ, दुर्गंधीयुक्त पाणी

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
मंगळवारी पेठ परिसरातील मानी मोहल्ला, जोधे परिसरात मागील काही दिवसांपासून नागरिकांना गढूळ, दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सकाळी नळाला पाणी सुरू झाल्यानंतर तब्बल ३० मिनिटांपर्यंत दुर्गंधीयुक्त व अत्यंत खराब पाणी येत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. पिण्याच्या पाण्याच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याने नगर परिषद प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी नंदू वैरागडे यांनी केली आहे.
या परिसरातील पाणीपुरवठा वाहिनीला गळती लागल्याचा संशय असून, मागील पाच



दिवसांपासून नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून मंगळवारी पेठेतील नंदू वैरागडे यांच्या घरासमोर मोठ्या पाणीवाहिनीची तपासणी करण्यासाठी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र, नेमकी गळती कुठे आहे, याचा शोध अद्याप सुरू आहे.
सोनबा लाडसकर, भास्कर झाडे आणि महेश गोन्नाडे यांच्या घरात मागील आठ दिवसांपासून



गढूळ, घाण व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली.
दूषित पाणीपुरवठ्याचे मूळ कारण आणि गळतीची जागा निश्चित होईपर्यंत शोधमोहीम सुरू ठेवण्यात येणार असल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले. शुक्रवारी या भागातील नियमित पाणीपुरवठा बंद असल्याने त्या दिवशी परिसरातील नळ जोडण्या बंद ठेवून गळतीचा शोध घेण्याचे काम अधिक प्रभावीपणे करण्यात येणार आहे.
दरम्यान, नागरिकांना लवकरात लवकर स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच दूषित पाणीपुरवठा तातडीने थांबविण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचे नगरसेवक विशाल देशमुख यांनी सांगितले.
पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने गळतीचा तातडीने शोध घेऊन पाणीवाहिनीची दुरुस्ती करावी आणि स्वच्छ पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचे प्रचारक बनावे : समतादूत राजेश राठोड



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे अंतर्गत समतादूत प्रकल्प ता. रामटेक व समाज कल्याण, नागपूर यांच्या वतीने सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून पुण्यश्लोक विद्यानिकेतन, खुमारी येथे व्यसनमुक्ती प्रबोधन व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापिका अर्चनादेवी यादव यांच्या हस्ते पिंपळ वृक्षाचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती रामटेक समतादूत राजेश राठोड, मौदा समतादूत ओमप्रकाश डोले व दुर्योधन बगमारे यांची होती. कार्यक्रमाचे संचालन गुणवंत तामखाने यांनी केले. समतादूत राजेश राठोड यांनी चांगल्या व वाईट व्यसनाची चर्चा करून दारू, तंबाखू, गुटखा, खर्रा व तत्सम नशेच्या व्यसनापासून विद्यार्थांनी दूर व सजग राहावे तसेच समाजात व्यसनमुक्ती करिता प्रचार व प्रसार करावा असे प्रतिपादन केले. या प्रसंगी शिक्षकवृंद प्रमोद गोरले, संजय ठाकर, प्रवीण तडसे व कुमारी प्रियांका साव आणि असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### खो-खो स्पर्धेत पूर्ती पब्लिक स्कूल सालेकसाचा शानदार विजय

**१९ वर्षे वयोगटात तालुकास्तरीय स्पर्धेत विजेतेपद, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र**



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**
पूर्ती पब्लिक स्कूल, सालेकसा येथील विद्यार्थ्यांनी १९ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर शानदार विजय मिळविला आहे. या दमदार कामगिरीच्या जोरावर शाळेच्या संघाने जिल्हास्तरीय स्पधेर्साठी पात्रता मिळविली आहे. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळकौशल्य, शिस्त, संघभावना आणि जिद्दीचे दर्शन घडवत प्रतिस्पर्ध्यांसमोर प्रभावी खेळ सादर केला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पूर्ती पब्लिक स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, शाळेच्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.
या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थाध्यक्ष, संस्था सचिव, प्राचार्य, सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विजयी संघातील सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्हास्तरीय स्पधेर्साठी संघाला शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. पूर्ती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे सालेकसा तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संध्या महाजन यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ संपन्न

**शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान दिले पाहिजे : माजी आ. आनंदराव देशमुख**

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे संध्या नीलकंठराव महाजन यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा नुकताच पार पडला. राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार आनंदराव देशमुख यांच्या अध्यक्ष तेखाली पार पडलेल्या समारंभात संस्थेचे कोषाध्यक्ष तथा नगरसेवक अंशुल देशमुख, संचालक नीलकंठ महाजन, घनश्याम बर्वे, प्राचार्य रविंद्र चन्ने, पर्यवेक्षक शैलेश परमार, मुख्याध्यापक निलेश टोंगसे उपस्थित होते.
याप्रसंगी सेवानिवृत्त प्रचार्य कमल लिखार, सुनंदा जांभुळकर, छाया शेंदरे सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी संजय दर्यापूरकर, सरोज पेटकर, अशोक हटवार, नीलकंठ पचारे, अरविंद खेडकर व महाजन कुटुंबीय उपस्थित



होते.
यावेळी संगीता नागोसे, सुनंदा जांभुळकर, कमल लिखार, सरोज पेटकर यांनी आपली मनोगते व्यक्त करतांना महाजन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना त्यांनी शाळेत २६ वर्ष ९ महिने केलेले शैक्षणिक कार्य, सेवाभावी वृत्तीचा, काम करण्याच्या कौशल्याचा याप्रसंगी गौरव केला. याप्रसंगी संध्या महाजन मॅडम व नीलकंठ महाजन यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुछ, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.
सत्काराला उत्तर देतांना महाजन मॅडम यांनी म्हणाल्या की, " हा माज्या आयुष्यातील स्नेह, जिव्हाळा, आपुलकी आणि आनंदाचा क्षण आहे. नोकरीच्या काळात संस्थेचे अध्यक्ष मा देशमुख साहेब व त्यांचे सर्व सहकारी पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. प्राचार्य आणि सहकारी शिक्षकांनी नेहमीच सहकार्य केले. विद्यार्थी विद्यार्थिनींना शिकविताना आयुष्य त्यातील प्रश्न, समस्या जाणून घेता आल्या. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे. याची जाणीव होतं गेली आणि वर्गात शिकवितांना जगण्याचे मोल कळत गेले. आपणासोबत माझे हे नाते शेवटपर्यंत राहील. मी आपणा सर्वांची ऋणी आहे. "
प्राचार्य रविंद्र चन्ने यांनी, "शिक्षक हा कायम शिकत आणि शिकवित असतो. आपण घेतलेले ज्ञान तो मुलांना वाटत असतो.आपुलकीने शिकविणारे शिक्षक कायम मुलांच्या स्मरणात राहतात. स्त्रीच आयुष्य प्रेम, करुणा, आपुलकीने भरलेलं असतं.", असे विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतांना माजी आमदार आनंदराव देशमुख यांनी सांगितले की, " प्रत्येक माणसाला आपले कर्तृत्व सिद्ध करण्याचा अधिकार आहे. शिक्षक म्हणून कार्य करतांना विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान दिले पाहिजे. शिक्षक विद्यार्थ्यांचं कौतुक करतात. तसेच शिक्षकांनी असे कार्य केले पाहीजे की, विद्यार्थी आणि समाजाने शिक्षकाचे कौतुक आदर करायला पाहिजे. "
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तारा दलाल, प्रास्ताविक दिप्ती देशमुख आणि आभार प्रदर्शन अंजुषा उजवणे यांनी केले. प्राचार्य रविंद्र चन्ने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता नागोसे, गीता चामट, अरुणा सायरे, रोशनी खागर तसेच सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी वर्गाने प्रयत्न केले.

# शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरव, मान्यवरांकडून सुखी, निरोगी व आनंदी भावी जीवनासाठी शुभेच्छा

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**
पंचायत समिती सालेकसा अंतर्गत जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक पाठशाळा, मुंडीपार येथे आयोजित सेवानिवृत्ती समारंभ उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात उच्च श्रेणी मुख्याध्यापक तथा शिक्षण विस्तार अधिकारी भुवनेश्वर ओंकारलाल ठाकरे आणि त्यांच्या पत्नी निर्मला भुवनेश्वर ठाकरे यांचा सन्मान करण्यात आला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सालेकसाच्या सभापती विनाताई कटरे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद सदस्या छायाताई नागपुरे, पंचायत समिती सदस्य गुमानसिंह उपराडे, सरपंच चेतलाल हटिले, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रामकलिताई कुराहे, गटसमन्वयक प्रदीप शरणागत, सोनपुरीचे माजी उच्च श्रेणी मुख्याध्यापक शंकरलाल नागपुरे, प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था गोंदियाचे संचालक सतीश दमाहे, रामाटोला केंद्रप्रमुख एस. जी. वाघाडे, कोटरा केंद्रप्रमुख मुकेश रहांगडाले, दर्रेकसा केंद्रप्रमुख मोरेश्वर बिसेन, बिजेपार केंद्रप्रमुख गणेश सानप, सालेकसा केंद्रप्रमुख विकास लंजे आदी मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी बी. ओ. ठाकरे यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे केलेल्या उल्लेखनीय कार्याचा, कर्तव्यनिष्ठेचा, विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणाचा आणि शैक्षणिक विकासातील योगदानाचा गौरव करण्यात आला.
सेवेचा कार्यकाळ संपला, तरी समर्पण, संस्कार आणि योगदानाच्या आठवणी सदैव जिवंत राहतात, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात सभापती विनाताई कटरे यांनी केले. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य ही जीवनातील नव्या पवार्ची सुरुवात असून, या काळात त्यांनी सुख, समाधान, उत्तम आरोग्य आणि



कौटुंबिक आनंद अनुभवावा, अशा शुभेच्छा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. यावेळी सत्कारमूर्ती बी. ओ. ठाकरे यांनी शिक्षकांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्राधान्य देऊन कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करावे, असे आवाहन केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदवीधर शिक्षक मनोज मोहारे यांनी केले. संचालन पदवीधर शिक्षक के. डी. नवगोडे यांनी केले, तर सहायक शिक्षक कृष्णा कुराहे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक राजेंद्र नागपुरे, टी. बी. नागपुरे, आर. बी. बरैया आणि स्वयंसेवक सुषमा उपराडे यांनी परिश्रम घेतले. मान्यवर, सहकारी शिक्षक आणि उपस्थितांच्या सहभागामुळे हा सेवानिवृत्ती सोहळा संस्मरणीय ठरला.

थोडक्यात

## आजपासून सुरू होणार नागपूरकरांचे तिसरे 'अभ्युदय सेवा प्रदर्शन-दान महोत्सव'

### चिटणवीस सेंटरमध्ये सेवाभावी संस्थांचे कार्य एकाच छताखाली; तीन दिवस निःशुल्क प्रशिक्षणाचेही आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेवाभावी संस्था, दाते, नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवक, तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्र यांना एका व्यासपीठावर आणून सामाजिक सेवेला बळ देण्याच्या उद्देशाने ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे आणि सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल मेडिकल रिसर्च ट्रस्टच्या सहकार्याने 'तिसरे अभ्युदय सेवा प्रदर्शन-दान महोत्सव २०२६' आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन २, ३ आणि ४ ऑक्टोबर २०२६ रोजी चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे होणार आहे. प्रदर्शन नागरिकांसाठी दररोज दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत खुले राहणार आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन २ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी इन्फोसेप्ट्स डेटा आणि एआयचे प्रशासन, सीएसआर आणि ईएसजी ग्लोबल हेड सुनील नरवारे, निवृत्त आयपीएस अधिकारी तथा हिंदू रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष टी. एस. भाल आणि Auro Inra Pvt. Ltd., Warora चे CSR व Land Acquisition विभागाचे उपमहाव्यवस्थापक श्रीकांत कुंभारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्वामी विवेकानंद यांच्या १५०व्या जयंती वर्षानिमित्त २०१२ मध्ये ग्रामायणच्या कायार्ला सुरुवात झाली. विविध सेवाभावी संस्थांना भेटी देणे, नागरिकांना सामाजिक प्रकल्पांची प्रत्यक्ष माहिती करून देणे आणि संस्था व समाज यांच्यातील संवाद वाढविण्यापासून या कायार्चा विस्तार झाला. सामाजिक संस्था, बचत गट आणि ग्रामीण उत्पादकांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले. स्वदेशी, स्वनिर्मित, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक उत्पादनांसाठी ग्रामायण प्रदर्शनाने स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, आतापर्यंत सात प्रदर्शने आयोजित करण्यात आली आहेत. गेल्या वर्षापासून सेवाभावी संस्थांसाठी स्वतंत्र 'अभ्युदय सेवा प्रदर्शन' सुरू करण्यात आले. सहभागी सेवाभावी संस्थांना हे व्यासपीठ पूर्णतः निःशुल्क उपलब्ध करून दिले जाते. प्रसिद्धीसोबत दाते, उरफ संपर्क, स्वयंसेवक, तज्ज्ञ, प्रशिक्षण आणि नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

## उमरेडच्या भाऊसाहेब मूळक फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय पोस्टर व राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात संपन्न

### २० महाविद्यालयांचा सहभाग; विद्यार्थ्यांच्या ज्ञान, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे प्रभावी प्रदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

येथील भाऊसाहेब मूळक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बी.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर सादरीकरण स्पर्धा, तर डी.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दोन्ही स्पर्धांना २० महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील माहितीची वैज्ञानिक आणि सर्जनशील पद्धतीने मांडणी केली. तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या विषयज्ञानाचे सादरीकरण करत उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले ज्ञान, सर्जनशीलता आणि सादरीकरण कौशल्य दाखविण्यासह विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. उत्साहपूर्ण वातावरणात दोन्ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, व्यवस्थापन, शिक्षकवृंद व आयोजन समितीने सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही अशा शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापनाने सांगितले.

## विसर्जनातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल, उमरेडमध्ये दोघांवर गुन्हा दाखल

### धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपावरून दोघांना रात्री उशिरा ताब्यात घेऊन सूचना पत्रावर सुटका

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

गणेश विसर्जनादरम्यान गांधीसागर तलावाजवळ गणपतीच्या मूर्तीचा तोल गेल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी उमरेड पोलिसांनी पवन मधुकर शिंगणे (४५, मंगळवारी पेठ) आणि विनोद नागोराव मेश्राम (६२, जोगीठाणा पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. धार्मिक भावना दुखावणारा आशय असलेला व्हिडीओ प्रसारित केल्याचा आरोप असून, दोघांना ताब्यात घेतल्यानंतर सूचना पत्रावर त्यांची सुटका करण्यात आली. शिवस्नेह गणेशोत्सव मंडळाच्या गणपतीचा विसर्जन सोहळा २७ सप्टेंबर रोजी पार पडला. सायंकाळी साडेपाच वाजता मुख्य मार्गाने मिरवणूक निघाली. विसर्जनस्थळी प्रक्रिया सुरू असताना नायलॉन दोरखंडाची गाठ निसटल्याने गणपतीच्या मूर्तीचा तोल गेला आणि मूर्ती आडवी झाली. मात्र, मूर्ती खंडित झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

घटनेनंतर पोलिस व मंडळाच्या सदस्यांनी तत्काळ धाव घेत परिस्थिती हाताळली. त्यानंतर मूर्तीचे विसर्जन पूर्ण करण्यात आले. या प्रकारात कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, मूर्तीचा तोल गेल्याचा व्हिडीओ इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप आणि फेसबुक स्टोरी आदी समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आल्याचे पोलिसांच्या तक्रारीत नमूद आहे. या व्हिडीओमुळे धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी २९ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा उमरेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दोघांना मध्यरात्री उशिरा ताब्यात घेतले. त्यानंतर मंगळवारी सूचना पत्रावर त्यांची सुटका करण्यात आली. दरम्यान, व्हिडीओ नेमका कोणी तयार केला, तो संबंधित व्यक्तींपर्यंत कसा पोहोचला आणि समाजमाध्यमांवर त्याचा प्रसार कोणत्या पद्धतीने झाला, याचा तपास उमरेड पोलिस करीत आहेत.

# वंदना वेलखोडे, रचना मिश्रा यांची पाककला स्पर्धेत बाजी

### 'स्वयंपूर्णा'तर्फे आयोजन, कांचन गडकरी यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वयंपूर्णा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित पाककला स्पर्धेमध्ये वंदना वेलखोडे वरचना मिश्रा यांनी विविध गटांमध्ये प्रथम पुरस्कार पटकवात बाजी मारली. संस्थेच्याअध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता कांचन गडकरी व सुप्रसिद्ध शेफ विष्णूमनोहर यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने स्वयंपूर्णाबहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बजाजनगरयेथील विष्णुजी की रसोई येथे पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत बेसनाचा एक खारा व एक गोड पदार्थ तयार करून आणायाचाहोता. १३२ महिलांनी सहभाग नोंदवत स्पर्धेलाउत्स्फूर्त प्रतिसाद दिला. फॉर्च्युनइंडस्ट्रीज व पू. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांनी स्पर्धेच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले.

यावेळी व्यासपीठावरसंस्थेच्या सचिव विजया भुसारी यांचीही प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला फॉर्च्युनचे प्रजय जैन, पु.ना. गाडगीळ ज्वेलर्सचे स्वाती आरमरकर, विष्णुजी कीरसोईचे प्रफुल्ल व वसुधा मनोहर यांचीही विशेष उपस्थिती होती. स्पर्धेचे परीक्षणप्रा. निलिमा जोशी, प्रतिभा पांडे, नेहा जोशी यांनी केले.

यावेळी कांचन गडकरीयांनी स्पर्धकांचा उत्साह वाढवला. त्या म्हणाल्या, 'स्वयंपूर्णा बहुउद्देशीय संस्था व गायत्री महिला औद्योगिक सहकारी संस्थांतर्फे महिलांसाठी सातत्याने विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात. महिलांनी कुटुंबसांभाळताना उद्योजक व्हावे आणि कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा, हाचयामागचा उद्देश आहे. स्त्री ही कुटुंबाचं हृदय असते. त्यामुळे तिच्यासाठी जास्तीत जास्त वैविध्यपूर्ण कार्यक्रम, स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

विष्णू मनोहर यांनी महिलांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. प्रत्येक स्पर्धकाने खूप छान प्रयत्न केले. विशेषतः आनंदीभावनेने तयार केलेले पदार्थ अधिक चवदार होत असतात, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन श्रद्धापांडे यांनी केले, तर आभार स्नेहल दाते यांनी मानले. रश्मी कवीश्वर यांनी संस्थेचे ध्येय गीत सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या संचालक व सदस्यांनी परीश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल**

गोड पदार्थ - वंदना वेलखोडे (प्रथम), मंदा बागडे (द्वितीय) आणि रश्मी मिश्रा (तृतीय). वर्षा टोपरे (उत्तेजनार्थ).

खारे पदार्थ - रचना मिश्रा (प्रथम), वंदना वेलखोडे (द्वितीय) आणि लीनातोटे (तृतीय). सुषमा चांदेवार, विद्यादेवगडे आणि रोहिणी देशकर (उत्तेजनार्थ)

## 'महाराष्ट्र से बॉलीवूड तक' हिंदी गीतांचा कार्यक्रम २ ऑक्टोबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हिंदी चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत मराठी कलाकार, गीतकार, संगीतकार, अभिनेते, अभिनेत्री आणि दिग्दर्शकांचे मोठे योगदान राहिले आहे. या समृद्ध परंपरेचा सांगीतिक वेध घेणारा 'महाराष्ट्र से बॉलीवूड तक' हा हिंदी गीतांचा विशेष कार्यक्रम गुरुवार, २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजता सायंटिफिक हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे.

'हिंदी चित्रपटसृष्टीत मराठी कलाकारांचे योगदान' ही या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना असलेल्या या कार्यक्रमाची संकल्पना स्वरशिल्पच्या संचालिका भाग्यश्री बारस्कर यांची आहे.

या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शालिनी ईटनकर उपस्थित राहणार आहेत. संदीप जोशी, देवयानी जोशी, नंदिनी पाटणकर, तन्मया मुंडले, सुनीता मोहरीर, विद्या काणे, वेंकटेश बुटी, शिवांगी बुटी, मृणालिनी भगत, पल्लवी उपदेव, वैशाली देव, विजया सालनकर, रेणुका वेलणकर, डॉ. सदाशिव भोळे, डॉ. शांतला भोळे, सुप्रिया फडके, देविका बुटी, मंजुषा जोशी, सलीला कामत, संगीता करंदीकर आणि श्रेया फडके या गायक कलाकारांचा कार्यक्रमात सहभागी राहणार असून त्यांना परिमल जोशी, नंदू गोहणे, प्रशांत नागमोते आणि रितेश त्रिवेदी वाद्यसंगत करतील. श्वेता शेलगावकर निवेदनाची धुरा सांभाळणार आहेत.

हा कार्यक्रम निःशुल्क असून संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## 'क्वांटम युगातील संधी'वर उद्या व्याख्यान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** टेक-नेक्स्ट असोसिएशनच्या वतीने द क्वांटम एरा - फ्रॉम क्वांटम पॉसिबिलिटी टू क्वांटम रेझिलिअन्स, प्रिपेअरिंग फॉर व्हॉट कम्स नेक्स्ट या विषयावर शनिवार, ३ ऑक्टोबर आयआयटीएम-डीओटी सामग्न्या टेक्नॉलॉजीज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र बारलिंगे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटर, हडस हायस्कूलजवळ, रामदासपेठ येथे सकाळी ११ ते दुपारी १२.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. रविंद्र बारलिंगे हे भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या राष्ट्रीय क्वांटम मिशनअंतर्गत कार्यरत नॅशनल हब फॉर क्वांटम कम्युनिकेशनशी संबंधित आहेत. या कार्यक्रमाचे प्रकल्प संचालक पंकज रडके असून, संयोजक शुभांगी रघुते आहेत. सूत्रसंचालन डॉ. विवेक नानोटी करतील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून इच्छुकांनी नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पालक-शिक्षक 'मुक्त संवाद' ४ ऑक्टोबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** पालकांना आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करता याव्यात तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींवर योग्य उपाययोजना करता याव्यात, या उद्देशाने स्त्री शिक्षण प्रसारक मंडळातर्फे पालक-शिक्षक 'मुक्त संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, महाल, नागपूर येथे होणार आहे. स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या या कार्यक्रमाला शिक्षणतज्ज्ञ व जिल्हा परिषद बाल संरक्षण समन्वयक प्रसेनजीत गायकवाड यांची उपस्थिती राहील. पालकांना आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसंदभार्तील अडचणी, समस्या तसेच विविध विषयांवरील भावना मोकळेपणाने मांडता याव्यात आणि त्यावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे, यासाठी या कार्यक्रमात संवादाची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## नक्षल चळवळीतील सैनिक झाले शाळेतले विद्यार्थी!

### बंदुकी सोडून पुस्तकं हाती धरली आणि ते मॅट्रिक झाले

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

यापूर्वी नक्षल चळवळीत सक्रिय राहिलेल्या, परंतु अलीकडील काळात माओवादाचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात परतलेल्या सात माजी माओवाद्यांनी यंदा दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली असून, त्यापैकी तिघांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये शस्त्रांचा त्याग केलेल्या २१० माओवाद्यांपैकी सात जणांनी ऑगस्टमध्ये छत्तीसगड ओपन स्कूलच्या माध्यमातून दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी गडचिरोलीतील गीता नारोटे यांनी वयाच्या ३५व्या वर्षी दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली असून, आता पुढील शिक्षण घेऊन परिचारिका होण्याची त्यांची इच्छा आहे.

गीता नारोटे या गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील गुरेकसा गावातील रहिवासी आहेत. वडिलांच्या हत्येनंतर त्यांना सहावीनंतर शिक्षण सोडावे लागले आणि पुढे त्या माओवादी चळवळीत सहभागी झाल्या. नक्षलवादी म्हणून सुमारे दोन दशकांचा काळ काम केल्यानंतर त्या चळवळ सोडून मुख्य प्रवाहात परतल्या. आणि त्यांनी पुन्हा शिक्षण सुरू करण्याचा निर्णय घेतला. आत्मसमर्पणानंतर मिळालेल्या आर्थिक मदतीतून त्यांनी काही पुस्तकं खरेदी केली आणि मोठ्या प्रमाणात स्वअभ्यास करून दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. आपण शिक्षक व्हावे अशी वडिलांची होती, त्यामुळे पुढे बारावी पूर्ण करून, परिचारिका होण्याचा प्रयत्न करणार असल्याचे गीता यांनी सांगितले.

बीजापूर जिल्ह्यातील अर्जुन ओयाम यानेही प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण सुरू ठेवत दहावीमध्ये प्रथम श्रेणी मिळवली. गावातील शाळांमध्ये शिक्षक येणे बंद झाल्यानंतर आणि सलवा जुडूम मोहिमेच्या काळात घर जळाल्यानंतर त्याने माओवादी चळवळीत प्रवेश केला होता. माओवादी संघटनेत असतानाही त्याने शिक्षण सुरू ठेवले आणि काही काळ इतरांना शिकवण्याचे कामही केले. आत्मसमर्पणानंतर पोलिस प्रशासन आणि मित्रांच्या मदतीने आवश्यक कागदपत्रे मिळवून त्याने यंदा परीक्षा दिली. आता पुढील शिक्षण घेऊन आपल्या गावात शिक्षक होण्याची त्याची इच्छा आहे.

कांकेर जिल्ह्यातील संतोष अचला उर्फ सन्नू यानेही यंदा दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. दुसरीतच शिक्षण सोडल्यानंतर तो माओवादी चळवळीत सहभागी झाला होता. पुढे नक्षल संघटनेतील तरुणांना गणित व हिंदी शिकवण्याचे काम करू लागला. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासोबतच शेती करण्याची इच्छा त्याने व्यक्त केली आहे. शस्त्रांचा हिंसक मार्ग सोडून शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या या माजी माओवाद्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे, राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या पुनर्वसन प्रक्रियेचे आणि शिक्षणाचेही महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा, अन्यथा आंदोलन

### राजकुमार (पप्पू) पटले यांचा शासनाला इशारा, तिरोड्यापुरता निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

जिल्ह्यातील केवळ तिरोडा तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात आला असून, गोंदिया, आमगाव, अजुर्नी मोरगाव, सडक अजुर्नी, सालेकसा, देवरी आणि गोरेगाव या तालुक्यांना वगळण्यात आले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती राजकुमार (पप्पू) पटले यांनी केली आहे. यंदाच्या खरीप हंगामात भात पिकावर कोड-किडा, मावा आणि करपा यांसारख्या रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. शेतकऱ्यांनी तीन ते चार वेळा कीटकनाशकांची फवारणी करूनही अपेक्षित परिणाम झाला नाही. त्यानंतर ऑगस्ट महिन्यातील ढगाळ वातावरण आणि सप्टेंबरमधील सततच्या पावसामुळे भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

पीक वाचविण्यासाठी केलेल्या खर्चाच्या तुलनेत उत्पादन मिळण्याची शक्यता कमी असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत केवळ एका तालुक्याला दुष्काळग्रस्त घोषित करणे हे जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांवर अन्यायकारक असल्याचे पटले यांनी म्हटले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करून गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा आणि शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी मदत व सवलती द्याव्यात. अन्यथा शेतकऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजकुमार (पप्पू) पटले यांनी दिला आहे.

## कला संचालक डॉ. किशोर इंगळे यांची भाऊ समर्थ जन्मशताब्दी समितीच्यावतीने घेतली विशेष भेट

### राज्य कला प्रदर्शनातील सर्वोत्कृष्ट कलाकृतीसाठी भाऊ समर्थ पुरस्कार सुरू करण्यात यावा, कला शिक्षण अभ्यासक्रमात भाऊ समर्थांच्या चित्रशैलीचा समावेश व्हावा, नागपुरात त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आर्ट गॅलरी व्हावी, नॅशनल आर्ट गॅलरीची शाखा नागपुरात असावी, भाऊ समर्थ जन्मशताब्दी समितीच्या मागण्या, कला संचालकांचे सहकार्याचे आश्वासन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भाऊ समर्थ जन्मशताब्दी समितीला शासन स्तरावर अधिकाधिक निधी प्राप्त कसा प्राप्त होईल या दृष्टीने शासनाच्या वेगवेगळ्या प्रतिनिधींशी संपर्क साधून त्याबाबतचे प्रस्ताव सादर करावेत, अशी सूचना, समितीला करत, व समितीने त्या दृष्टीने अगोदरच सर्व संबंधितांकडे जो पाठपुरावा सुरू केला आहे त्याबद्दल समाधान व्यक्त करत महाराष्ट्र राज्याचे कला संचालक डॉ



किशोर इंगळे यांनी या समितीच्या नियोजित कार्यात सहकार्य करण्याचे आश्वासन, समितीच्यावतीने, मुंबई मुक्कामी त्यांची भेट घेणारे संयुक्त कार्यवाह प्रदीप पवार यांना दिले आहे.

समितीने आखलेल्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. डॉ किशोर इंगळे हे स्वतः देखील भाऊ समर्थ जन्मशताब्दी समितीचे एक मार्गदर्शक आहेत. समितीच्यावतीने कला संचालक डॉ. किशोर इंगळे यांना समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी व पदाधिकाऱ्यांनी अगोदरच जे पत्र पाठवून आर्थिक सहकार्यासह, भाऊ समर्थ हे जे जे स्कूल ऑफ आर्ट्सचे विद्यार्थी होते, हे लक्षात घेऊन, दरवर्षी आयोजित होणाऱ्या राज्य कला प्रदर्शनातील सर्वोत्कृष्ट चित्रकृतीसाठी भाऊ समर्थ पुरस्कार सुरू करण्यात यावा.

प्रथितयश कलावंतांना भाऊ समर्थ यांच्या नावे दरवर्षी भाऊ समर्थ स्मृती सन्मान देऊन सन्मानित करण्यात यावे, भाऊ समर्थ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शासनाने नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे कला दालन, आर्ट गॅलरी, निर्माण करावी, केंद्र सरकारच्या नॅशनल आर्ट गॅलरीची शाखा मुंबईत आहे, तशीच एक नॅशनल आर्ट गॅलरीची शाखा महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपुरात स्थापली जावी, राज्याच्या कला शिक्षण अभ्यासक्रमात भाऊ समर्थ यांच्याविषयीच्या माहितीचा समावेश करण्यात यावा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत, 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या ग्रंथ मालिका योजनेंतर्गत, भाऊ समर्थ यांच्यावरील ग्रंथ प्रकाशित केला जाईल असे कृपया बघावे, शासनाने देखील भाऊ समर्थ यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करावे.

अशा ज्या मागण्या केल्या आहेत त्याकडे देखील प्रदीप पवार यांनी कला संचालकांचे या भेटीत लक्ष वेधले. त्याच प्रमाणे भाऊ समर्थ जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या नियोजित कार्यांच्या तपशीलावर चर्चा केली.

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## स्मृतीदिनानिमित्त कॉ. चंद्रकांत श्रीखंडे यांना कोराडी शाखेतर्फे आदरांजली



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी जिल्हा कार्याध्यक्ष कॉंमरेड चंद्रकांत श्रीखंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त कोराडी शाखेच्या वतीने आदरांजली व्यक्त करण्यात आली. यावेळी कोराडी शाखेचे अध्यक्ष ताराचंद पखिडे, शाखा प्रधान सचिव विलास भालेराव, शाखा महिला कार्यवाह संगीता आळणे उपस्थित होते. चळवळीतील योगदानाबद्दल चंद्रकांत श्रीखंडे यांच्या आठवणी व अनुभव यावेळी कथन करण्यात आल्या.

## वलनीत गांजाची विक्री करणाऱ्या तिघांना अटक, खापरखेडा पोलिसांची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

वलनी वेकोलि येथील पोलीस चौकीलगत असलेल्या क्रिकेट मैदानावर गांजा विक्री करणाऱ्या तिघांना खापरखेडा पोलिसांनी मंगळवारी रात्री अटक केली. या कारवाईत पोलिसांनी १२५ ग्रॅम गांजा, दोन दुचाकी आणि मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेल्या गांजाची किंमत सुमारे १ हजार ५०० रुपये आहे.

प्राप्त माहितीनुसार,तब्येत यादव -३९, रा. वलनी कॉलनी, कन्हैया सिंग -५१, रा. चनकापूर आणि निरोज डेहरिया - ३२, रा. चनकापूर अशी आरोपीची नावे आहेत. मंगळवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास वलनी पोलीस चौकीजवळ असलेल्या क्रिकेट मैदानावर गांजाची अवैध विक्री सुरू असल्याची गुप्त बातमी खापरखेडा पोलिसांना मिळाली. त्या आधारे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे १२५ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी आणि मोबाईल फोन जप्त केला असून तिन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. ही यशस्वी कारवाई पीएसआय मारूती जांगिलवार, पोलीस कर्मचारी आशिष मेश्राम, राजेश राठोड, बादल गिरी, संदीप सगणे, शेखर वानखेडे यांच्या पथकाने केली.

## अविनाश महालक्ष्मे यांना भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता पुरस्कार

### अ.भा. मराठी पत्रकार परिषदेच्या पुरस्कारांची घोषणा, हेमंत देसाई यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा "आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार" ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना जाहीर करण्यात आला आहे. २५ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ पत्रकार भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता पुरस्कार नागपूरचे ज्येष्ठ पत्रकार अविनाश महालक्ष्मे यांना जाहीर झाला आहे. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी पत्रकार परिषदेत परिषदेच्या विविध पुरस्कारांची घोषणा केली.

अ.भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पत्रकारितेत उत्तुंग कार्य केल्याबद्दल विविध पुरस्कारांनी पत्रकारांना गौरविण्यात येते. पत्रसृष्टीत परिषदेचे हे पुरस्कार प्रतिष्ठेचे समजले जातात. जीवनगौरव पुरस्कार यापुर्वी दिनू रणदिवे, मा.गो. वैद्य, पंढरीनाथ सावंत, प्रकाश बाळ जोशी, मधुकर भावे, रामभाऊ जोशी आदि मान्यवरांना दिला गेला आहे.

अन्य पुरस्कार असे- परिषदेचे भूतपूर्व अध्यक्ष आचार्य प्र.के.अत्रे पत्रकारिता पुरस्कार- प्रशांत कदम, हिंदी पत्रकारितेचे पितामह बाबुराव पराडकर यांच्या नावे दिला जाणारा ज्येष्ठ पत्रकार अनुराग त्रिपाठी यांना जाहीर झाला आहे. दत्ताजीराव तटकरे स्मृती पुरस्कार : सचिन परब, नागोजीराव उर्फ आण्णासाहेब दुधगावकर स्मृती पुरस्कार : राजकीय विश्लेषक अभय देशपांडे, स्वातंत्र्य सैनिक मनोहरपंत चिवटे आरोग्य पत्रकारिता पुरस्कार : संतोष आंधळे, स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख देवडीकर कृषी पत्रकारिता पुरस्कार : सुनील पाटील, कोल्हापूर, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद भागवत शोध पत्रकारिता पुरस्कार : महेश तिवारी, गडचिरोली, सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार : जान्हवी मुळे, दिल्ली, संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार- बापुसाहेब जाधव सातारा यांना जाहीर झाला आहे. रोख रक्कम स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात मुंबईत होणाऱ्या एका शानदार समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

# घड्याळाविना टायमिंग !

झाडाझडती



**विनोद देशमुख**
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

लोकप्रिय आणि सांसदीय अशा दोन्ही राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेले बोटावर मोजण्याएवढेच राजकीय नेते भारतात होऊन गेले आणि आजही आहेत. त्यात महाराष्ट्रातून शरच्चंद्र पवार यांचंच नाव नंबर एकवर घ्यावं लागेल. त्यांची राजकीय कारकीर्दसाठी उलटलेली आणि सांसदीय कारकीर्दसाठी पूर्ण करण्याच्या सीमारेषेवर आहे. १९६७ मध्ये पहिल्यांदा आमदार झाल्यापासून आजतारखेपर्यंत आमदार किंवा खासदार यापैकी एका पदावर ते आहेतच.

पुढच्या वर्षी या 'पदग्रहणा' ला साठ वर्षे पूर्ण होतील. आणखी एक विशेष म्हणजे, सांसदीय लोकशाहीच्या चारही सभागृहांचे ते सदस्य राहिले आहेत. विधानसभा, विधान परिषद, लोकसभा आणि राज्यसभा या सभागृहांच्या सदस्यत्वाचा असा 'चौकार' मारलेल्या, देशातील मोजक्याच नेत्यांमध्येही त्यांचा समावेश आहे.

एवढ्या दिग्गज नेत्याची विश्वसनीयता मात्र अजिबात नाही, हा अनुभव त्यांचे कार्यकर्ते आणि लोक वारंवार घेत आले आहेत. राष्ट्रवादी पक्षाच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होण्याच्या शक्यता व्यक्त होऊ लागल्या, तेव्हा पवारांनी या वावड्या उठू दिल्या आणि आता आपली भूमिका स्पष्ट केली की, "आम्ही स्वतःहून कोणाच्या सोबत जाणार नाही. दुसऱ्या कोणाला (अर्थ- राष्ट्रवादी-अप) आमच्या सोबत यायचं असेल तर भाग वेगळा!" राष्ट्रवादी-अपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यावर स्पष्ट केलं की, विलीनीकरणाच्या चर्चा निराधार आहेत. आम्ही स्वतंत्र अस्तित्वासह महायुतीत सक्षमतेनं काम करीत आहोत. पण, शरद पवार हे टायमिंग साधण्यात वस्ताद आहेत. वरील विधानातून यावेळी त्यांच्या मनात काय शिजत आहे, ते लवकरच कळेल.

तटकरेंचं म्हणणं अगदीच चुकीचं नाही. स्वतःच्या फायद्याचं टायमिंग साधावं ते पवारांनीच! १९७८ मध्ये मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी काँग्रेसविरोधकांना हाताशी धरून पुलोदचा प्रयोग केला आणि वसंतदादा पाटलांच्या पाठीत खंजिर खुपसला. नंतर राजीव गांधींच्या काळात काँग्रेसमध्ये परत जाऊन एकदा नव्हे, दोनदा मुख्यमंत्रिपद मिळवलं. सोनिया गांधी परदेशी असल्याचा मुद्दा काढून ते पुन्हा काँग्रेसबाहेर आले आणि काही महिन्यातच महाराष्ट्रात त्याच काँग्रेससोबत आघाडी करून ते सरकार १५ वर्षे चालवलं! मधल्या काळात स्वतःही सलग १० वर्षे केन्द्रात कृषी मंत्रिपद भोगलं.

काँग्रेससोबत असतानाच २०१४ मध्ये भाजपानं न मागितलेला पाठिंबा देऊन शिवसेनेला धडा शिकवणारे हेच शरद पवार, २०१९ मध्ये मात्र त्याच शिवसेनेला फूस लावून उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री बनवतात, हेही महाराष्ट्रानं पाहिलं. यातूनच २०२२ मध्ये शिवसेना फुटण्यास प्रोत्साहन मिळालं. हे सारे परस्परविरोधी वाटणारे खेळ पवारांनी टायमिंग साधूनच केले. पण, २०२३ मध्ये अजितदादांनी काकांना धोबीपछाड मारून त्यांचं घड्याळच पळवलं, तेव्हापासून त्यांचं टायमिंग थोडं गडबडलं की काय, असं वाटायला लागलं आहे त्यामुळे यावेळचा सोबत येण्याजाण्याचा मुद्दा नेमका कोणाच्या बाबतीत असेल, नक्की सांगता येत नाही. राष्ट्रवादी-अप परत मिळवून महायुतीत फूट पाडणं, स्वतःच भाजपाशी जवळीक करून भावी पिढ्यांच्या भविष्याची तरतूद करून ठेवणं वगैरे पर्याय पवारांच्या मनात असू शकतात. 'घड्याळ' नसतानाचं हे 'टायमिंग' साधेल का, ते तटकरे पाहतील!

## राष्ट्रपिता महात्मा गांधी



सत्य, अहिंसेच्या मार्गावर चालुन
उगारले सत्याग्रहाचे अस्त्र महान
स्वातंत्र्य समराचा नायक होऊनी
दिले ब्रिटिशांच्या सत्तेला आव्हान

मोडीत काढून मक्ता उच्चभ्रूंचा
मांडले तू स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान
समाजातील शेवटच्या घटकास
मिळण्या स्वातंत्र्याचे समाधान

चले जाव चे रणशिंग फुंकले अन्
गोऱ्यांविरूद्ध चेतविला हिंदुस्तान
गुलामीच्या जाजक श्रृंखलांमधुनी
दिले आम्हा तू स्वातंत्र्याचे वरदान

स्वदेशीचा मूलमंत्र देऊनीया तुम्ही
वाढविला भारतीयत्वाचा सन्मान
खेड्यांकडे चला या संदेशामधुनी
जागविले देशाला या कृषिप्रधान

आधी केले मग सांगितले न्यायाने
दिले आम्हा आत्मनिर्भरतेचे ज्ञान
शिकवण तुझी स्वच्छतेची घेऊन
चाले येथे स्वच्छ भारत अभियान

गांधींचा देश म्हणून जगात साऱ्या
ओळखला जातो भारत हिंदुस्तान
काही करंटे मात्र मिटवाया निघाले
हे युग पुरूषा तुझेच नाव-निशाण

सत्य, अहिंसा अन् शांतीचा तू पुजारी
भासे जणू मानवतेच्या प्रेषिता समान
शत शत नमन करीतो आज तुम्हाला
हे राष्ट्रपिता, स्वीकारा अमुचा प्रणाम

**- गणेश पांडे, नागपूर**

## कंत्राटी कामगारांसाठी ईएसआयसी जागरूकता शिबिर ९ ऑक्टोबर रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** राज्य कामगार विमा रुग्णालय, सोमवारी पेठ, नागपूर यांच्या वतीने तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशन (७२८) यांच्या सहकार्याने कंत्राटी कामगारांसाठी ईएसआयसी जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता. सिंधू भवन, राधाकृष्ण हॉस्पिटलमागे, वर्धमान नगर येथे हे शिबिर होणार आहे. डॉ. हर्षवर्धन कांबळे व ब्रांच मॅनेजर मनोज हुमणे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी ईएसआयसी योजनेतील वैद्यकीय सुविधा, विमा कार्डाचा वापर तसेच कामगारांच्या अडीअडचणी व समस्यांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सर्व कंत्राटी कामगारांनी शिबिरास आवर्जून उपस्थित राहून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विक्की भा. कावळे व जयपाल हटवार यांनी केले आहे.

## पीडित मीरा काळबांडे यांची न्यायासाठी पत्रकार परिषदेत धाव

### इमामवाडा पोलिसांच्या तपासाची निष्पक्ष चौकशी करण्याची मीना अडकने यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** रामबाग परिसरातील रहिवासी पीडित महिला मीरा नामदेव काळबांडे यांनी आपल्याला न्याय मिळावा, यासाठी पत्रकार परिषद घेऊन इमामवाडा पोलिसांच्या तपासाबाबत गंभीर आरोप केले. याप्रकरणी २३ सप्टेंबर २०२६ रोजी, इमामवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, अद्यापही अपेक्षित न्याय मिळालेला नसल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मीरा काळबांडे यांच्या तक्रारीनुसार, प्रकरणातील त्यांचे संपूर्ण जबाब अद्याप नोंदविण्यात आलेले नाहीत. तसेच घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब घेण्यात आले नसून, इलेक्ट्रॉनिक तसेच भौतिक पुरावे संकलित करण्याची कार्यवाहीही योग्य पद्धतीने झालेली नसल्याचा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला.




या प्रकरणाचा तपास निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात यावा, तसेच सर्व संबंधित साक्षीदारांचे जबाब नोंदवून उपलब्ध पुरावे तपासण्यात यावेत, अशी मागणी समाजसेविका मीना अडकने यांनी केली. पीडित महिलेला न्याय मिळण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तपासाची निष्पक्ष चौकशी करावी, अशीही मागणी त्यांनी केली. पत्रकार परिषदेला पीडित महिला मीरा काळबांडे यांच्यासह रामबाग परिसरातील सुमारे २५ ते ३० महिला उपस्थित होत्या. यावेळी महिलांनी पीडितेला न्याय मिळण्याची मागणी केली.

# वर्धा जिले मे 'निधि आपके निकट' कार्यक्रम का आयोजन





**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

सेवाग्राम, जिला वर्धा में 'निधि आपके निकट' कार्यक्रम का आयोजन किया गया। कार्यक्रम के दौरान सदस्या, नियोक्ता, ठेकेदारों, पेशनरीं एवं अन्य हितधारकों को ईपीएफओ की विभिन्न सेवां, योजनाऔ, पेंशन एवं बीमा लाभो, शिकायत निवारण तथा अनुपालन संबंधी विषयों पर जानकारी एवं मार्गदर्शन प्रदान किया गया।

कार्यक्रम के आयोजन में नई तालीम समिति की निदेशक सुश्री सुषमा शर्मा का सहयोग रहा। कार्यक्रम में ईपीएफओ की ओर से समलेशकुमार साव, प्रवर्तन अधिकारी, विजय ठाकरे, प्रवर्तन अधिकारी तथा संजीव कुमार, वरिष्ठ सामाजिक सुरक्षा सहायक उपस्थित रहे तथा हितधारकों की विभिन्न समस्यां एवं क्युरीज के संबंध में आवश्यक जानकारी एवं मार्गदर्शन प्रदान किया।

कार्यक्रम के माध्यम से उपस्थित हितधारकों को ईपीएफओ की सेवां का अधिकतम लाभ लेने तथा सामाजिक सुरक्षा सै संबंधित अधिकारों एवं दायित्वां के प्रति जागरूक किया गया।

## विजय दयाराम मेश्राम यांना 'राज्यस्तरीय जीवनदीप गौरव पुरस्कार'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपुरचे कवी, लेखक व सामाजिक कार्यकर्ते विजय दयाराम मेश्राम यांना नुकताच ग्लोबल फाऊंडेशन पुणे तर्फे मौलिक समाज कार्य आणि उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी २०२६ चा 'राज्यस्तरीय जीवनदीप पुरस्कार' प्रदान करून सम्मानित करन्यात आले. ग्लोबल फाउंडेशन पुणेच्या अध्यक्षा ज्योति जाधव आणि विद्यानिकेतन फाउंडेशनचे अध्यक्ष माई सिंधुताई सपकाळ यांचे मानसपुत्र शशिकांत कोचडे तसेच विषयतज्ञांच्या निवड समितिने विजय मेश्राम यांच्या कार्याची दखल घेऊन वाई जि. सातारा येथे लोकमान्य टिळक वाचनालयाच्या रमेश गरवारे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह प्रदान करून या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित 'लागीर झालं जी' या मराठी मालिकेचे निर्माते, दिग्दर्शक तेजपाल वाघ, 'देऊळबंद २' या चित्रपटातील अभिनेते अतुल कुडले, वाईचे समाज भुषण सत्यजीत माने आणि डॉ मोहसिन पठाण या मान्यवरांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



विजय मेश्राम यांच्या या यशाबद्धल कवी लोकनाथ यशवंत, प्रा. विजयाताई मारोतकर, पाली भाषेचे अभ्यासक नरेश डी. मेश्राम, डॉ. पराग मेश्राम इत्यादींनी मनःपुर्वक अभिनंदन केले.

# अग्निसुरक्षेचे प्रशिक्षण बालपणापासूनच आवश्यक!

## निलेश उकुंडे यांच्या आगीपासून वाचण्यासाठी मोलाच्या सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कधी कुठे आगीचा सामना करावा लागलाच तर आपला जीव कसा वाचवावा याचे प्रशिक्षण अगदी बालपणापासून मुलांना देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अग्निसुरक्षा तज्ज्ञ निलेश उकुंडे यांनी केले. संचालक (माहिती व जनसंपर्क) कार्यालयातर्फे आयोजित संवाद उपक्रमात आज ते बोलत होते.

आग हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे, मात्र ती नियंत्रणात असेल तरच सुरक्षित असते आणि नियंत्रणाबाहेर गेली तर जीव धोक्यात येऊ शकतो असे सांगून उकुंडे म्हणाले की, आग लागली की माणूस गोंधळून जातो आणि विचारक्षमता गमावून बसतो. त्यामुळे सेकंदाचाही वेळ न घालवता योग्य निर्णय घ्यायचा असतो. आज घरांमध्येही जीवनशैलीमुळे आगीची शक्यता वाढली आहे.

घरातील बहुतांश वस्तू या लगेच पेट घेणाऱ्या असतात. त्यामुळे सावध राहणे जास्त गरजेचे आहे. अनेक इमारतींमध्ये 'फायर एस्केप रुट' असतो, पण या मार्गात कुंड्या, कपाटे अशा वस्तू ठेवल्या जातात व आगीची घटना घडली की बाहेर पडताना याच गोष्टी अडथळा ठरतात. त्यामुळे हा मार्ग नेहमी मोकळा असला पाहिजे. तसेच प्रत्येक बहुमजली इमारतीबाहेर 'असेम्ब्ली पॉईंट' असावा आणि इमारतीतील सर्वांना तो माहीत असला पाहिजे. आग लागली की इमारतीतील प्रत्येकाने या पॉईंटवर एकत्र येऊन तेथे थांबून राहणे गरजेचे असते. त्या आधारेच इमारतीत किती लोक अडकले आहेत हे कळू शकते. कोणतीच आग एकदम मोठी होत नाही. सुरुवातीला ती छोटीच असते. घरी किंवा कार्यालयातील अग्निशमन यंत्र आपल्याला चालवता येत असेल तर आग छोटी असतानाच थांबवता येते, असेही त्यांनी सांगितले.



बहुतांश सोसायट्यांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसवली असते. मात्र या यंत्रणेची नियमित देखभाल आवश्यक आहे, तरच गरज पडली तर ती कार्यान्वित होऊ शकेल. घरात गॅसचा वास येत असेल तर लाईटची सुरू असलेली बटन बंद करू नका, गाडी चालवताना धुराचा वास आल्यास लगेच ती थांबवून बाहेर पडा, उंच इमारतीत अडकले असल्यास सुरक्षित जागी जाऊन जिवंत राहण्याची शक्यता वाढवा, तसेच आग लागली असताना चुकूनही लिफ्टचा उपयोग करू नका, अशा मोलाच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

आपण जागरुक राहिलो तरच दैनंदिन जीवनात सुरक्षित राहू शकतो, असे सांगून माहिती संचालक डॉ. गणेश मुळे म्हणाले की, आगीचा इशारा मिळाल्याबरोबर आपल्याला नेमके कुठून बाहेर पडायचे आहे, याची माहिती प्रत्येकाला असली पाहिजे.

आपण, आपलं घर, आपले कार्यालय सुरक्षित कसे राहील, याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी. वाहन चालवताना आगीची शक्यता गृहीत धरून काही व्यवस्था वाहनात करणे गरजेचे असल्याचेही डॉ. मुळे यांनी सांगितले. आभार सहायक संचालक अपर्णा यावलकर यांनी मानले.